गुरुवार, २५ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १२८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## काँग्रेस, बसप आमदारांचा भाजपमध्ये प्रवेश



**लखनऊ :** उत्तर प्रदेशमध्ये सन २०२२मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीआधी काँग्रेसला जोरदार धक्का बसला आहे. गांधी कुटुंबीय आणि काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधींचा बालेकिल्ला मानला जाणाऱ्या रायबरेली मतदारसंघाच्या काँग्रेस आमदार अदिती सिंह भाजपमध्ये दाखल झाल्या आहेत. अदिती सिंह यांच्याशिवाय आझमगडच्या सगडी मतदारसंघाच्या बसप आमदार वंदना सिंह यांनीदेखील भाजपचा मार्ग धरला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष स्वतंत्रदेव सिंह यांच्या उपस्थितीत या दोन्ही महिला नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. २०१७ साली अदिती सिंह या रायबरेली मतदारसंघातून पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. त्यांच्या रूपात या जागेवर भाजपला एक मोठा चेहरा मिळाला आहे. त्याचप्रमाणे आमदार वंदना सिंह यांच्या प्रवेशाने बसपालाही धक्का बसला आहे.


## अंतरंग

'महिलांच्या सुरक्षेबाबत आघाडी सरकार बेफिकीर'/२

माथेरानमध्ये पर्यावरणपूरक वाहतुकीस समिती अनुकूल/५

आजपासून न्यूझीलंडविरुद्ध पहिला कसोटी सामना/६


# एसटी संपाचा तिढा कायम

## सरकारकडून पगारवाढ; कर्मचारी मात्र विलिनीकरणावर ठाम

**मुंबई : प्रतिनिधी**

**गेले अनेक दिवस सुरू असलेल्या संपाची राज्य सरकारने दखल घेत अंतरिम पगारवाढ केली आहे. परिवहनमंत्री अनिल परब यांनी बुधवारी (दि. २४) पत्रकार परिषद घेऊन याबाबतची घोषणा केली. सध्या एसटी महामंडळाचे राज्य शासनात विलिनीकरण करण्याची बाब ही उच्च न्यायालयाच्या समितीसमोर असल्याने तो निर्णय तातडीने घेता येणे शक्य नसल्याचे त्यांनी या वेळी म्हटले, मात्र बहुतांश एसटी कर्मचारी विलिनीकरणावर ठाम आहेत.**



सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या पत्रकार परिषदेला उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, भाजप नेते आमदार गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत उपस्थित होते.

या वेळी अनिल परब म्हणाले की, जे कर्मचारी १ वर्षे १० वर्षे सेवा देत आहेत त्यांचा पाच हजार रुपये पगार वाढवण्यात आला आहे. १० ते २० वर्षांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात चार हजार रुपयांची वाढ केली आहे, तर २० वर्षे व त्याहून अधिक कर्मचाऱ्यांच्या पगारात दोन हजार पाचशे रुपयांनी वाढ केली आहे. इतर भत्तेही सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच मिळतील. एसटीचे उत्पन्न वाढल्यास इन्सेंटिव्ह दिला जाईल. एसटीचा पगार यापुढे १० तारखेच्या आत होईल याची हमी राज्य सरकारने घेतली आहे, मात्र कर्मचारी विलिनीकरणावर ठाम आहेत.

### 'कर्मचाऱ्यांशी चर्चा करून आज भूमिका जाहीर करणार'

एसटी कर्मचाऱ्यांचे शिष्टमंडळ म्हणून सरकारसोबत चर्चेला गेलेले नेते आमदार सदाभाऊ खोत आणि आमदार गोपीचंद पडळकर यांनी नंतर आझाद मैदानात जाऊन कर्मचाऱ्यांची भेट घेतली. कर्मचाऱ्यांशी चर्चा करून उद्या म्हणजेच गुरुवारी (दि. २५) सकाळपर्यंत संपासंदर्भात पुढील भूमिका जाहीर करू, अशी माहिती या नेत्यांनी या वेळी दिली.

# पनवेल महापालिकेच्या ७८३ कोटींच्या अंदाजपत्रकाला स्थायी समितीची मंजुरी

## मालमत्ता करात ४७ टक्के सवलत



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या सन २०२१-२२च्या सुमारे ७८३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला बुधवारी (दि. २४) झालेल्या स्थायी समितीच्या विशेष सभेत मंजुरी देण्यात आली. यामध्ये मालमत्ता करामध्ये वार्षिक भाडेमूल्याच्या ३० टक्के सूट व १७ टक्के सवलत अशा एकूण ४७ टक्के सवलतीला या वेळी मंजुरी देण्यात आली.

पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीची २४ मार्च रोजी झालेली सभा सन २०२१-२२च्या अंदाजपत्रकाबाबत पूर्ण माहिती घेऊन सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी स्थगित करण्यात आली होती. ही सभा बुधवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी ११.३० वाजता अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, सदस्य प्रकाश बिनेदार, दर्शना भोईर, राजश्री वावेकर, निलेश बाविस्कर, महादेव मधे, संतोष भोईर, उपायुक्त विठ्ठल डाके, गणेश शेटे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावाडे, लेखाधिकारी डॉ. संग्राम व्होरकटे, लेखापरीक्षक विनयकुमार पाटील, लेखापाल सुनील मानकामे आदी उपस्थित होते.

महापालिकेने २०२१-२२च्या अंदाजपत्रकात मालमत्ता करामध्ये वार्षिक भाडेमूल्याच्या ३० टक्के सूट दिली आहे. याशिवाय ३१ जुलैपर्यंत कर भरणाऱ्याला आणखी १० टक्के, ३० दिवसांत भरणाऱ्याला आणखी पाच टक्के व ऑनलाइन भरणाऱ्याला दोन टक्के सवलत अशी एकूण ४७ टक्के सूट देण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट २९ गावांचा विकास करण्यासाठी अनेक निर्णय महापालिकेने या अंदाजपत्रकात घेतले आहेत. चारही प्रभागांच्या कार्यालयाची बांधकामे करणे, सिडकोकडून प्राप्त होणाऱ्या उद्याने, दैनिक बाजार, खुल्या जागा यांची विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. जिल्हा परिषदेच्या ५२ शाळांचे महापालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर इमारती दुरुस्ती, बांधकाम यांच्यावरील खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांसाठीचे निश्चित धोरण आखण्यात आले असून शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठी पुरेशी तरतूद जमा व खर्चाच्या अंदाजात प्रस्तावित करण्यात आली आहे. या सभेत अंदाजपत्रकावर चर्चा करून त्याला मंजुरी देण्यात आली.

# मुख्यमंत्री कोविड रिलीफ फंडातील फक्त २४ टक्के निधीचा झाला वापर

## आरटीआयमधून धक्कादायक खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुख्यमंत्री कोविड रिलीफ फंडात लोकांनी भरघोस देणगी दिली, मात्र कोविडग्रस्तांना यातून संपूर्ण मदत करण्यात आली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. माहितीचा अधिकार (आरटीआय) अंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, कोरोनाच्या काळात महाराष्ट्र मुख्यमंत्री कोविड रिलीफ फंडमध्ये सुमारे ७९९ कोटी रुपये जमा झाले. लोकांनी मोठ्या प्रमाणात दिलेल्या रकमेपैकी केवळ २४ टक्के रक्कम खर्च झाली. या निधीत सुमारे ६०६.३ कोटी रुपये अद्याप जमा आहेत.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोविड निवारणासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन नागरिकांना केले होते. यात मोठ्या प्रमाणात लोकांनी पैसे दान केले. महाराष्ट्र मुख्यमंत्री कोविड-१९ रिलीफ फंड अंतर्गत निधी ७९९ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे, जो सहा महिन्यांपूर्वीच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. आरटीआय कायद्यांतर्गत निधीमध्ये जमा केलेल्या आणि खर्च केलेल्या एकूण रकमेचा तपशील मिळवल्यानंतर कार्यकर्ते अनिल गलगली यांनी राज्य सरकारने फक्त १९२ कोटी रुपये म्हणजे २४ टक्के निधीचे वितरण केल्याचे म्हटले आहे.

गलगली यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून महापालिकेच्या आणि इतर सरकारी रुग्णालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा सुधारण्यासाठी कोविड निधी वापरावा, अशी मागणी केली आहे. राज्याने आता नवीन देणग्या घेणे थांबवले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे.

## कृषी कायदे रद्द करण्याचा प्रस्ताव मंजूर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घोषणेनंतर केंद्र सरकारने तीनही कृषी कायदे रद्द करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. हे कायदे मागे घेण्याच्या प्रस्तावाला बुधवारी (दि. २४) मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर आता या संदर्भातील विधेयक संसदेत मांडले जाणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडले जाऊ शकते.

## निवडक

### राज्याचे मुख्य सचिव कुंटे यांना ईडीचे समन्स

**मुंबई :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या मनी लॉण्डरिंग प्रकरणात राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे यांना अंमलबजावणी संचालनालयाने (ईडीने) समन्स बजावले आहे. त्यांना २५ नोव्हेंबर रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. देशमुख राज्याचे गृहमंत्री असताना कुंटे हे गृह विभागाचे तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव पदावर कार्यरत होते. त्यानंतर त्यांना राज्याच्या मुख्य सचिवपदावर बढती देण्यात आली.

### देवेंद्र फडणवीसांनी घेतली राज ठाकरे यांची भेट

**मुंबई :** राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २४) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी जाऊन भेट घेतली. त्यांच्यासोबत पत्नी अमृता फडणवीसही होत्या. राज, त्यांची पत्नी शर्मिला ठाकरे यांच्यासमवेत फडणवीस आणि त्यांची पत्नी अमृता यांनी काढलेला फोटो सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे.



# 'रवी डायवेअर'च्या कामगारांना वेतनवाढ

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय भारतीय जनरल कामगार संघटनेने तळोजा एमआयडीसीतील रवी डायवेअर कंपनीतील कामगारांना १० हजार ५०० रुपयांची भरघोस वेतनवाढ मिळवून दिली आहे. या संदर्भातील करार बुधवारी (दि. २४) भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात संघटनेचे सल्लागार तथा भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला.

भाजप पुरस्कृत जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्याचे काम सुरू आहे. रवी डायवेअर कंपनीतील कामगारांची अनेक दिवसांपासूनची पगारवाढ आणि सुविधांचे प्रश्न अनेक दिवस प्रलंबित होते. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीचे डायरेक्टर विकास सरोगी, मॅनेजर यरूलकर यांच्यासोबत कामगारांची पगारवाढ व सुविधांबाबत चर्चा केली. त्यानुसार जय भारतीय जनरल कामगार संघटना आणि रवी डायवेअर कंपनी यांच्यात १०,५०० रुपयांचा भरघोस पगारवाढ करार झाला.

या वेळी संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, सचिव जगदिश म्हात्रे, कार्यालयीन सचिव समिरा चव्हाण, रवींद्र कोरडे, अरुण नरावडे, जालिंदर तिकुडे, चंद्रकांत फडके, रमेश राजबर, मोहन शेशकर, सदानंद तुटी, सचिन पाटील आदी उपस्थित होते.


## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी



### पनवेल महानगरपालिका हद्दीत
### गुरुवार, दि. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे
# कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- सिद्धी करवले, रा.जि.प. शाळा
- धानसर रा.जि.प. शाळा
- बेलपाडा मंदिर
- पेठ, रा.जि.प. शाळा
- ओवे, रा.जि.प. शाळा
- पाले खुर्द पाटीलवाडी, रा.जि.प. शाळा
- तोंडरे, खालचा पाडा, रा.जि.प. शाळा
- घोट रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघ्राची वाडी
- ढोंगऱ्याचा पाडा, रा.जि.प. शाळा
- कामोठे, रा.जि.प. शाळा


# नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी

## राज्यात १०५ ठिकाणी २१ डिसेंबरला मतदान



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात विविध ३२ जिल्ह्यांतील १०५ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २१ डिसेंबर रोजी मतदान, तर २२ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्यासाठी संबंधित नगरपंचायतींच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी बुधवारी (दि. २४) येथे केली.

मदान यांनी सांगितले की, राज्यातील एप्रिल २०२० ते मे २०२१ या कालावधीत मुदत संपलेल्या ८१ आणि डिसेंबर २०२१मध्ये मुदत संपणाऱ्या १८, तसेच नवनिर्मित सहा अशा एकूण १०५ नगरपंचायतींच्या प्रत्येकी १७ सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होईल. त्यासाठी १ ते ७ डिसेंबर या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. ४ व ५ डिसेंबर रोजी सुटी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी ८ डिसेंबर रोजी होईल. मतदान २१ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०पर्यंत असेल, तर २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल.

सार्वत्रिक निवडणूक होत असलेल्यांमध्ये रायगड जिल्ह्यातील खालापूर, तळा, माणगाव, म्हसळा, पोलादपूर आणि नवनिर्मित पाली नगरपंचायतीचा समावेश आहे. विविध जिल्ह्यांतील सात नगर परिषदा, नगरपंचायतींच्या रिक्त जागांसाठीदेखील २१ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

# प्राथमिक शाळा लवकरच सुरू होणार -राजेश टोपे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात कोरोना रुग्णसंख्येचा आलेख घसरू लागल्याने ग्रामीण भागांतील पाचवी ते बारावी आणि शहरी भागांतील आठवी ते बारावीचे वर्ग आधीच सुरू आहेत. आता पहिलीपासूनचे वर्गही सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. राज्याच्या चाईल्ड टास्क फोर्सनेही पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याची परवानगी दिली आहे, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली.

पहिली ते चौथीचे वर्ग सर्व अटी-शर्थींसह सुरू करण्याची परवानगी देण्याची सूचना चाईल्ड टास्क फोर्सने केली आहे. याबाबत विचार सुरू असून मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय होईल, असे आरोग्यमंत्री टोपे प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले.

राज्यात ५० टक्के आसनक्षमतेची परवानगी सिनेमागृह आणि नाट्यगृहांना देण्यात आली आहे. यापेक्षा स्थिती बदलली तर निर्बंध आणखी कमी करण्यात येतील. कोविड कमी झाला असला, तरी मोठ्या प्रमाणात गर्दी व्हावी, सोशल डिस्टन्सिंगचा फज्जा उडावा असा होत नाही. सध्या जर्मनी, ऑस्ट्रिया, अमेरिकेमध्ये डेल्टा व्हायरसचा प्रादूर्भाव दिसत आहे. पुढच्याला ठेच मागचा सावध या उक्तीप्रमाणे बेफिकीर राहून चालणार नाही. कोरोना नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, असेही टोपे यांनी नमूद केले.

# महिला सुरक्षेबाबत आघाडी सरकार बेफिकीर

## भाजप नेत्या विजया रहाटकर यांची घणाघाती टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

बीड, साकीनाका, परभणी, डोंबिवलीसह राज्यात अनेक ठिकाणी बलात्कार आणि महिलांवरच्या अत्याचारांच्या घटना घडल्या, तरी राज्यातील निर्भयांचा आक्रोश सरकारच्या कानी पडलेला नाही. महिला सुरक्षेच्या विषयात आघाडी सरकारची बेफिकीरी आणि निष्क्रियता चीड आणणारी आहे. आता महिलांनी स्वसुरक्षेसाठ स्वतःच कायदा हाती घ्यायचा की घरकोंबड्या सरकारप्रमाणे त्यांनीही घरातच बसून राहायचे, असा संतप्त सवाल भाजपच्या राष्ट्रीय सचिव आणि राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष विजया रहाटकर यांनी बुधवारी (दि. २४) पत्रकार परिषदेत केला. महिलांची सुरक्षा करण्यात अपयशी ठरलेल्या आघाडी सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकारच नाही, असा घणाघातही त्यांनी केला.



भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. प्रदेश प्रवक्ते गणेश हाके या वेळी उपस्थित होते. विजया रहाटकर यांनी या वेळी महिला सुरक्षाप्रश्नी सरकारच्या अपयशाचा पाढाच वाचून दाखवला. त्या म्हणाल्या की, या सरकारने दोन वर्षे महिला सुरक्षेसंदर्भात केवळ महिलांची घोर निराशा आणि फसवणूक केली. ज्या शिवरायांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला साडीचोळी देऊन सन्मानाने घरी पाठवले, त्या छत्रपतींचा दाखला वेळोवेळी देणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील सदस्य रोजच महिलांचा अवमान करताना दिसत आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी तत्कालिन गृहमंत्र्यांनी २०१९च्या हिवाळी अधिवेशनात शक्ती कायदा आणण्याच्या घोषणा केल्या तो कायदा अजूनही लागू झालेला नाही.

महिला अत्याचार प्रश्नी चहुबाजूंनी रान उठल्यानंतर जवळपास दीड वर्षांनंतर अखेर सरकारला महिला आयोग अध्यक्षपदाच्या नियुक्तीचा ऑक्टोबर २०२१ हा मुहूर्त सापडला. वाढत्या अत्याचाराविरोधात आंदोलन असो अथवा भाजपाच्या १२ महिला आमदारांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेले पत्र असो, प्रत्येक वेळी भाजपने 'धक्का' दिला की या सरकारची गाडी हलणार, अशी स्थिती राज्यात आहे.

मोदी सरकारकडून महिला सबलीकरणासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत, तसेच महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महिला अत्याचार रोखण्यासाठी २०२० साली नवी नियमावलीही जाहीर करण्यात आली. त्यानुसार महिलांवरील अत्याचाराचा एफआयआर दाखल करण्यास टाळाटाळ केल्यास पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई, बलात्काराचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करणेही बंधनकारक करण्यात आले आहे, मात्र महाराष्ट्रात एफआयआर नोंदवण्यात हलगर्जी, पीडितेचा जबाब नोंदवून घेण्यात टाळाटाळ होत आहे, असेही त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या की, महिला अत्याचारांच्या असंख्य घटना घडत असताना सरकारमधील मंत्र्यांना त्याचे काहीच सोयरसुतक नाही. एका मंत्र्याला तरुणीच्या आत्महत्येला जबाबदार असल्याचा आरोप झाल्याने राजीनामा द्यावा लागला, तर दुसरे मंत्री सेलिब्रिटींच्या मुलाच्या अटकेविरोधात, जावयांवरील कारवाईविरोधात पत्रकार परिषदा घेण्यात आणि वायफळ चर्चा करण्यात मग्न आहेत. लोकप्रतिनिधी, राष्ट्रवादी युवा प्रदेशाध्यक्ष यांच्यावर सत्तेचा गैरवापर करत महिलांवर अत्याचार केल्याचे आरोप होत आहेत. लखीमपूर प्रकरणाच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंदची हाक देणाऱ्या सरकारमधील मंत्र्यांना राज्यातील वाढत्या महिला अत्याचाराच्या घटना दिसत नाहीत. महाराष्ट्र बंदसाठी जितकी यंत्रणा कामाला लावली गेली तितकी मेहनत जर महिला सुरक्षेसाठी केली असती, तर लेकीसुनांना सुरक्षित वाटले असते.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सुकापूर परिसरात पथदिव्यांचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकासाच्या दृष्टिकोनातून वाटचाल करत विविध सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे काम करीत आहे. त्या पार्श्वभूमीवर येथील भगतवाडी ते मालेवाडी स्टॉप या माथेरान रोडवर पथदिवे उभारून हा परिसर प्रकाशमय करण्यात आला. या पथदिव्यांचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. २४) करण्यात आले.

पथदिवे लोकार्पण सोहळ्याच्या वेळी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, सुकापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता पाटील, माजी सरपंच आलुराम केणी, महेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, राजेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सर्व सामान्य जनतेच्या आपल्याकडून अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी काम करत राहणे ही तुमची आमची सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे एकजुटीने काम करीत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत.

# नवी मुंबईत लवकरच सुसज्ज लायब्ररी

## आमदार मंदा म्हात्रे यांची माहिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील लायब्ररी करिता देण्यात येणारा भूखंड हस्तांतरण करार लवकरच होणार आहे. या लायब्ररीसाठी सुमारे १० कोटी रुपये खर्च येणार असून नवी मुंबई शहरात सुसज्ज लायब्ररी होणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी आग्रोळी-बेलापूर येथे बुधवारी (दि. २४) पत्रकारांशी बोलताना सांगितले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांना व वाचकांना विविध क्षेत्रातील वाचनसाहित्य उपलब्ध व्हावे याकरिता सुसज्ज व सर्व सुविधांयुक्त मध्यवर्ती लायब्ररी उभारावी, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई पालिका प्रशासनास सातत्याने केली होती. सिडको प्रशासनाकडूनही भूखंड मिळणेकरिता वेळोवेळी आमदार म्हात्रे यांनी पाठपुरावा केला होता. याच अनुषंगाने सिडको प्रशासनाने सानपाडा सेक्टर ११ येथील नियोजित लायब्ररी करिता १७६६ चौमी क्षेत्रफळ असलेला भूखंड क्र. १ हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला असून महापालिका व सिडको यांमध्ये जागा हस्तांतरण करार लवकरच करण्यात येणार आहे.

वर्षभरात सानपाडा येथे लायब्ररी सुरू होणार असून एमपीएससी व यूपीएससी परीक्षा देणाऱ्या नवी मुंबईतील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होणार आहे. तसेच लायब्ररीमध्ये अभ्यासिका सुरू करण्यात येणार असून विविध क्षेत्रातील विद्यार्थ्यांना व वाचकांना त्याचा फायदा होणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.

# लघुपट स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कर्तृत्वसंपन्न कारकिर्दीवर आधारित 'कर्मयोगी नमो'या लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या, तसेच या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे.



कर्मयोगी नमो या स्पर्धेतील लघुपट १ मिनिट ते १२ मिनिटांचे असतील, तसेच या लघुपटांना भाषेचे बंधन नसेल. स्पर्धकांना प्रथम क्रमांक ७५ हजार, द्वितीय ५१ हजार, तृतीय ३१ हजार, तर पाच उत्तेजनार्थ प्रत्येकी १५ हजार, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.

या वेळी सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, प्रदेश सदस्य सुनील सिन्हा, कोकण विभाग सहसंयोजक अक्षया चितळे, उरण संयोजक मनोहर जामकर, सहसंयोजक गणेश जगताप, पनवेल शहर संयोजक संजीव कुलकर्णी, तालुका संयोजक मंगेश वाकडीकर, निखिल गोरे, श्वेता कुलकर्णी, अनुराधा शिंदे उपस्थित होते.

स्पर्धकांनी तयार झालेला लघुपट ५ डिसेंबर २०२१ पर्यंत namokarmayogi@gmail.com या ई-मेलवर पाठवायचा आहे. या संदर्भात उत्तर रायगड जिल्ह्यासाठी अभिषेक पटवर्धन ९०२९५८०३४३ व निखिल गोरे ८०९७२४८८७७ यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती अभिषेक पटवर्धन यांनी दिली.

# राजपत्रित अधिकारी महासंघाची कोकण भवन समन्वय समिती जाहीर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कोकण भवन समन्वय समितीच्या अध्यक्षपदी माहिती व जनसंपर्क विभागाचे कोकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांची निवड झाली आहे. ही घोषणा महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई यांनी बुधवारी (दि. २४) येथे केली.

महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सन २०२१-२०२३ची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये कार्याध्यक्षपदी राज्यकर विभागाचे उपायुक्त कमलेश नागरे, सचिवपदी सार्वजनिक आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, खजिनदारपदी राज्यकर विभागाचे सहायक आयुक्त सुबोध लवटे, उपाध्यक्षपदी सिडकोचे उपजिल्हाधिकारी संदीप माने, लेखा व कोषागारे सहसंचालक अनुदीप दिघे, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे अधीक्षक अभियंता ए. एस. टोपले, अधीक्षक अभियंता एस. जी. शेलार यांची निवड झाली. याशिवाय अन्यही नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीस कोकण भवनमधील सर्व विभागांचे राजपत्रित अधिकारी उपस्थित होते.



# अपघातग्रस्त दीपक पाटील यांना आर्थिक मदत

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते धनादेश

**उरण : वार्ताहर**

नवघर येथील मल्टीमोड लॉजिस्टीक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड वेअर हाऊसमध्ये अपघात झाला होता. या अपघातात जखमी झालेल्या दीपक महादेव पाटील यांना भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी उपचारासाठी संबंधित कंपनीकडून आर्थिक मदत मिळवून दिली आहे. या मदतीचा धनादेश आमदार महेश बालदी यांच्या हस्ते पाटील यांना देण्यात आला.

काही दिवसापूर्वी नवघर येथील मल्टीमोड लॉजिस्टीक इंडिया प्राव्हेट लिमिटेड वेअर हाऊसमध्ये फोअरक्लीपच्या धक्क्याने भिंत कोसळून दीपक महादेव पाटील यांचा डावा हात निकामी झाला. घटनास्थळी भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, वशेणी ग्रामपंचायतचे माजी सरपंच विजय म्हात्रे, उद्योजक देवेंद्र पाटील, नामदेव पाटील आदींनी जाऊन कंपनी मालक विशाल गोयल, व्यवस्थापक इम्त्तीयाज शेख शरिफ यांच्याबरोबर



आमदार महेश बालदी दूरध्वनीवरून चर्चा केली. त्यानुसार अपघातग्रस्त दीपक पाटील यांना कंपनी मालकाने सहकार्य करण्याचे मान्य केले. त्या पार्श्वभूमीवर सहा लाख रकमेचा धनादेश आमदार महेश बालदी यांच्या हस्ते देण्यात आला.

अपघात झाल्यामुळे उपचाराचा सर्व खर्च कंपनी देईल आणि येणारा मेडिक्लेमची रक्कम दीपक यांनाच देण्यात येईल, तसेच त्याला कामावर घेऊन त्याला पगार चालूच राहील याची ग्वाही देण्यात आली. या वेळी भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शहा, नगरसेवक राजू ठाकूर, मनोहर सहतिया उपस्थित होते. आमदार महेश बालदी, भाजप उरण पूर्व विभाग कमिटी व दीपक गावंड यांच्या परिवाराकडून कंपनी मालकांचे आभार मानण्यात आले.

# मराठी विज्ञान परिषदेतर्फे ऑनलाइन विज्ञान परीक्षा

**पनवेल : प्रतिनिधी**

मराठी विज्ञान परिषदेने 'वेध २०३५' ही ऑनलाइन शालेय विज्ञान परीक्षा आयोजित केली आहे. सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या परीक्षेसाठी लिखित मजकूर, व्हिडीओ व्याख्याने, प्रयोगांचे व्हिडीओ, विज्ञान-कोडी, कूट-प्रश्न, विज्ञान-खेळ अशी भरपूर अभ्यास-सामग्री पुरवली जाईल. यासाठीची प्रवेश प्रक्रिया ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. ऑनलाइन शालेय विज्ञान परीक्षेचे हे दुसरे वर्ष आहे.

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र आणि खगोलविज्ञान या विषयांवरील अभ्यास-सामग्री दर १५ दिवसांच्या अंतराने चार टप्प्यांमध्ये संकेतस्थळावर उपलब्ध होईल. आठहून अधिक शिक्षणतज्ज्ञ-शास्त्रज्ञांनी याचे विकसन केले आहे. प्रत्येक टप्प्याच्या शेवटी सराव चाचणी असेल. या चार टप्प्यांनंतर १० दिवसांच्या कालावधीत परीक्षा होईल. सहावी-सातवीसाठी प्रथमा परीक्षा आणि आठवी-नववीसाठी द्वितीया परीक्षा; मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमांतून होईल. प्रत्येक परीक्षेत गुणानुक्रमे पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांस दुर्बीण, द्विनेत्री, सूक्ष्मदर्शी यासारखी पारितोषिके आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांस प्रशस्तीपत्रेही मिळणार आहेत. १९ फेब्रुवारीला निकाल जाहीर केला जाईल आणि राष्ट्रीय विज्ञानदिनी पारितोषिक वितरण होईल. परीक्षेसाठी https://mavipa.org/vedh2035 या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे.

# पर्यावरण जनजागृतीसाठी उरण ते गोवा सायकल प्रवास

**उरण : प्रतिनिधी**

प्लास्टिकच्या जास्त वापरामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे. त्यामुळे प्लास्टिक वापरण्यात बंदी करावी या मुख्य विषयावर जनजागृती करण्याकरिता उरण ते गोवा असा ६५० किलोमीटरचा सायकल प्रवास उरण येथील विवेक घरत आणि रोहा येथील सूरज खांडेकर या दोन तरुणांनी केला आहे.

प्रदूषण ही समस्या मोठी गंभीर बनली आहे. हवेतील प्रदूषण समुद्रातील प्रदूषण प्लास्टिक मुले समुद्रात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊ लागले आहे. समुद्रातील विविध जीवांना त्याचा त्रास होऊ लागला आहे. अनेक प्रजाती नष्ट होऊ लागल्या आहेत. त्यामुळे या प्लास्टिक बंदीच्या जनजागृती करण्यासाठी विवेक भगत आणि सूरज खांडेकर यांनी ६५० किलोमीटरचा प्रवास सायकलवरून केला आहे. या सायकल प्रवासातून केलेल्या जनजागृतीमुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.



# ...म्हणून ओबीसींचे सर्वेक्षण रखडले

## भाजप नेते राम शिंदेंचा राज्य सरकारवर आरोप

**अहमदनगर : प्रतिनिधी**

'ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधीचा इम्पिरिकल डाटा सादर करण्यास सांगितले होते. हे काम राज्य मागासवर्ग आयोगाचे आहे. त्यासाठी ४५० कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे, मात्र महाविकास आघाडीने आयोगाला हा निधी दिला नाही. त्यामुळे हे काम रखडले आहे,' असा आरोप भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी मंत्री प्रा. राम शिंदे यांनी केला.

याबाबतीत राज्य सरकार केंद्र सरकारकडे बोट दाखवत आहे, मात्र केंद्राकडे हा डाटा उपलब्ध नाही. तसा तो असता तर न्यायालयाने केंद्रालाच आदेश दिला असता, असेही शिंदे म्हणाले. अहमदनगरमध्ये प्रसार माध्यमांशी संवाद साधताना शिंदे



यांनी ही माहिती दिली आहे. या वेळी भाजपचे शहरजिल्हाध्यक्ष भय्या गंधे आणि अन्य पदाधिकारीही उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, राज्यातील महाविकास आघाडी म्हणजे तीन पक्षांचे तीन स्वतंत्र सरकार असल्यासारखी परिस्थिती आहे. त्यांच्या निर्णयात कोणताही ताळमेळ नाही. त्यांना ओबीसींचे काहीही देणेघेणे नाही. त्यामुळे न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही सरकारने यासाठी हालचाली केल्या नाहीत. डाटा संकलित करण्याचे काम करणाऱ्या आयोगाला सुमारे ४५० कोटी रुपयांची गरज आहे. तशी मागणी आयोगाने सरकारकडे केली आहे, मात्र सरकार निधी देत नाही, त्यामुळे काम करणे अशक्य असल्याचेही आयोगाने कळविले आहे. आपली जबाबदारी टाळण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारकडे बोट दाखवून ओबीसींची दिशाभूल करीत आहे, अशी टीका राम शिंदे यांनी केली आहे.

हा डाटा केंद्र सरकारकडे नाही. तसा तो असता तर कोर्टाने केंद्र सरकारला आदेश दिला असता. अशाच परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू झाल्या आहेत. यासाठी सरकारने अध्यादेश काढून ओबीसींना आरक्षण दिले आहे. मात्र त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आलेले आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करताना यासंबंधी न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून निवडणूक होत असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ ओबीसींवर ही टांगती तलवार कायम राहणार आहे. या निवडणुकांचे प्रमाण सुमारे ८५ टक्के आहे. त्यामुळे जर वेगळा निर्णय झालाच तर ओबीसींचे फार मोठे नुकसान होणार आहे. म्हणून भाजपने यासंबंधी ठाम भूमिका घेतली आहे. पूर्वीप्रमाणे घटनेनुसार ओबीसींना आरक्षण मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. यासाठी पुन्हा राज्यभर आंदोलन उभारण्यात येणार आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

### दुखवटा

**प्रल्हाद धामणकर**

**पेण :** तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी उपाध्यक्ष प्रल्हाद धामणकर (वय ८६) यांचे गुरुवारी (दि. १८) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. धामणकर यांनी साने गुरुजींच्या जीवनावर चित्रे काढून त्यावर ३५००पेक्षा अधिक व्याख्याने व कथाकथनाचे कार्यक्रम सादर केलेत. त्यांना राष्ट्रपती पुरस्कारासह एकूण ७६० पुरस्कार मिळाले आहेत. कै. प्रल्हाद धामणकर यांना रविवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता लोकमान्य हौसिंग सोसायटी क्लब हाऊस येथे श्रद्धांजली वाहण्यात येईल.



### संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर दक्षता

# नवी मुंबईमध्ये कोरोना चाचण्यांत वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना बाधितांच्या प्रमाणात घट झालेली दिसत असली तरी जागतिक परिस्थिती पाहता तिसऱ्या लाटेचा धोका संपलेला नाही हे लक्षात घेऊन कोरोनाच्या विषाणूला आहे तिथेच रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने दैनंदिन कोविड टेस्टींगचे प्रमाण कमी होऊ दिलेले नाही.

सद्यस्थितीत कोरोना रुग्ण आढळतो अशा इमारतीत, सोसायटी व वसाहतीत सर्वांचे टेस्टींग करण्यात येऊन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या निर्देशानुसार टारगेटेड टेस्टींगवर भर देण्यात येत आहे. दररोज सरासरी सात हजारांहून अधिक नागरिकांची कोविड टेस्टींग करण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत २२ लक्ष २३ हजार ५६९ इतक्या कोविड टेस्ट करण्यात आलेल्या असून त्यामध्ये शासन निर्देशानुसार आरटी-पीसीआर टेस्ट ६० टक्के आणि न्टिजन टेस्ट ४० टक्के असे टेस्टचे प्रमाण कायम राखले आहे. त्याचप्रमाणे रुग्णांच्या संपर्कातील व्यक्ती शोधाचे प्रमाणही ३०हून अधिक आहे.

अशाप्रकारे रुग्णसाखळी खंडीत करण्यासाठी ट्रेसींग, टेस्टींग व ट्रिटमेंट अशा त्रिसूत्रीकडे बारकाईने लक्ष दिल्याने कोरोना बाधितांची संख्या नियंत्रित होत असल्याचे दिसून येत आहे. तथापि टेस्टींगचे प्रमाण कमी होऊ न देणे व त्याचवेळी जास्तीत जास्त नागरिकांनी कोविड लसीचा दुसरा डोस घेऊन लस संरक्षित होण्याकडे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांचे बारकाईने लक्ष आहे.

दिवाळीच्या उत्सवी कालावधीत कोरोना विषाणूचा प्रसार जास्त प्रमाणात होईल ही शक्यता लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या. या सुटीच्या कालावधीतही कोविड टेस्टींग सुरू ठेवण्यात आले होते. तसेच नागरिकांची लसीकरणाअभावी गैरसोय होऊ नये यादृष्टीने महापालिका रुग्णालयातील लसीकरण केंद्रे कार्यान्वित ठेवण्यात आलेली होती.

सद्यस्थितीत उपचार सुरू असलेली कोरोना रुग्णसंख्याही ३०१ इतकी मर्यादीत आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुग्ण दुपटीचा कालावधी ३५०४ दिवस म्हणजेच साधारणत: ९.५ वर्षे इतका झालेला असला कोरोनाचा प्रसार वाढू नये याकरिता नवी मुंबई महानगरपालिका दक्ष आहे.




**लसीकरणालाही वेग**

नवी मुंबईकर नागरिक लवकरात लवकर लस संरक्षित व्हावेत यादृष्टीने लसीकरणाला वेग देण्यात येत आहे. लसीकरणासाठीही सर्व रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्रे, २ मॉल मध्ये ड्राईव्ह इन लसीकरण तसेच इएसआय हॉस्पिटल वाशी येथील जम्बो लसीकरण केंद्रे कार्यान्वित आहेत. याशिवाय हर घर दस्तक अभियान अंतर्गत नागरिकांच्या घराजवळ जाऊन लसीकरण करण्यात येत आहे. याशिवाय वाशी, नेरुळ व घणसोली या रेल्वे स्टेशन्सवर लसीकरण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

**कोरोनाचा धोका अजून टळलेला नाही. ज्यांचे लसीकरण शिल्लक आहे त्यांनी त्वरित लसीकरण करून घ्यावे व लसीकरण झाले असले तरी कोरोना सुरक्षा त्रिसूत्रीचे पालन करावे.**

**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई मनपा**

## पनवेल मनपातर्फेही चाचण्यांवर अधिक भर

### महिनाभरात फक्त ६५८ कोरोनाबाधित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या महिन्याभरात पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये ७७,६२३ संशयितांची कोरोना चाचणी केल्यानंतर ६५८ जणांना कोरोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले होते. तर उपचारांदरम्यान महिन्याभरात कोरोनामुळे १५ जणांचा मृत्यू झाल्यांची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडे आहे. या आकडेवारीमुळे पालिका क्षेत्रात आतापर्यंत कोरोनामुळे मृतांची संख्या १३६३ वर पोहचली आहे.

पालिका क्षेत्रात रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही दिलासा देणारे म्हणजे ९७.८४ टक्के आहे. यामध्ये सर्वाधिक बरे होणारे ९८.६८ टक्के रुग्ण हे खारघर वसाहतीमधील आहेत. गेल्या महिन्यात २२ ऑक्टोबर या दिवशी ३४ रुग्ण आढळले होते. तर २२ नोव्हेंबरला आठ नवीन रुग्णांची नोंद करण्यात आली. गेल्या महिन्यात २२ ऑक्टोबरला पालिका क्षेत्रात विविध रुग्णालय व घरी उपचार घेणारे ३३४ रुग्ण होते. तर २२ नोव्हेंबर या दिवशी ११० रुग्ण संपूर्ण पालिका क्षेत्रात उपचार घेत आहेत.

पालिकेने गेल्या महिन्यात ७७,६२३ जणांची कोरोना चाचणी केली असून पालिकेने १० लाख कोरोना चाचण्यांचे लक्ष्य ठेवले आहे. गेल्या महिन्यापासून आतापर्यंत पालिका क्षेत्रातील ८६५ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. दरम्यान, नागरिकांनी कोरोनामुक्त शहरासाठी पालिकेच्या कोरोना चाचणी मोहिमेत साथ द्यावी, असे आवाहन पनवेल पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी यापूर्वी अनेकदा केले आहे.



## उरण कुंभारवाडा येथे गटाराच्या कामाचे भूमिपूजन

**उरण :** नगर परिषद हद्दीतील कुंभारवाडा वॉर्ड न. ४ मधील गटाराच्या कामाचे भूमिपूजन सोमवारी (दि. २२) करण्यात आले.

आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने व नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहरध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह यांच्या मार्गदर्शनाखाली उरणमध्ये विकास कामे होत आहेत. कुंभारवाडा येथे गटार कामाच्या भूमिपूजनावेळी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उमेश वैवडे, एकनाथ माने, मनीषा नवले, मोरेश्वर घाग, सुरेंद्र जाधव आदी उपस्थित होते.

## सिग्नलचे नियम न पाळणाऱ्या ३३८ वाहनचालकांवर कारवाई

**खारघर : प्रतिनिधी**

तळोजा फेज वनकडून मुंब्रा, खारघर, नावडे फाटा या ठिकाणी सिग्नलचे पालन न करणाऱ्या ३३८ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

या ठिकाणी जाणाऱ्या वाहनचालकांकडून सिग्नलचे पालन होत नसल्याचे निदर्शनास येताच तळोजे वाहतुक पोलीस ठाण्याचे उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या मार्गदर्शनाखाली तळोजा वाहतूक शाखाने वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. रॅपिड ॲक्शन फोर्स चौक तळोजा याठिकाणी तळोजा वाहशाखेकडून विशेष मोहीम आयोजित करून मागील आठवड्यापासून सुरु असलेल्या या मोहिमेत ३९८ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. सिग्नलचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचे लायसन्स निलंबनाकरिता प्रादेशिक परिवहन विभाग यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत.

नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळावे व वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन तळोजा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी केले आहे.

## अपहृत मुलाची अवघ्या चार तासांत सुटका

**पनवेल : वार्ताहर**

एका सहा वर्षीय मुलाचे त्याच्याच नात्यातील माणसांनी लग्नाला विरोध केला म्हणून अपहरण केले होते, परंतु खांदेश्वर पोलिसांनी अवघ्या चार तासांत या मुलाला मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन येथून अपहरणकर्त्यांकडून त्याची सुटका केली.




तक्रारदार विनय गामा सिंग (वय ३९, रा. विचूंबे) यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, त्यांची पत्नी पिंकी सिंग यांच्या मोबाइलवर अज्ञात व्यक्तीने फोन करून व एसएमएसद्वारे धमकी दिली की, त्यांचा मुलगा यश (वय ६, नाव बदललेले आहे.) व त्यांची भाची (वय २१) हे आमच्या ताब्यात असून दहा लाख रुपये घेऊन मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे या, अन्यथा दोघांनाही ठार करू. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार पोलिसांचे पथक बांद्रा टर्मिनल येथे रवाना झाले. यावेळी सखोल तपास केला असता त्यांनी आरोपी विपीन हिरालाल अग्रहरी (वय २१) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी मुलगा व भाचीबद्दल विचारले असता धक्कादायक माहिती समोर आली. विपीन अग्रहरी यानेच सहा महिन्यांपूर्वी जिच्याबरोबर लग्न केले होते तीनेच आपल्या मामाच्या मुलाचे अपहरण केले होते. अधिक चौकशीमध्ये त्या दोघांच्या लग्नाला मामाचा विरोध होता. यामुळे मामाला धडा शिकविण्यासाठी त्यांनी मामाच्या मुलाचे अपहरण करून त्यांच्याकडे १० लाख रुपयाची खंडणी मागितली होती. या मुलाला घेवून उत्तरप्रदेशला पळून जाणार होते. या कट त्यांनी उत्तरप्रदेशला सुल्तानपुर येथे रचला होता. पोलिसांच्या दक्षतेमुळे हा कट उघडकीस आला. याकामी रेल्वे पोलिसांनीसुद्धा महत्त्वाची भूमिका बजावली.

## निवडक

### उरणमध्ये रविवारी आरोग्य शिबिर

**उरण :** अमन पॉलिक्लिनिकने क्वीन्स केअर क्लिनिक यांच्या सहकार्याने आरोग्यविषयक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून रविवारी (दि. २८) सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत अमन पॉलिक्लिनिक (पत्ता : यश मेडिकलजवळ, ठाकूर अपार्टमेंट, उरण) येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराअंतर्गत नागरिकांची मोफत तपासणी होणार आहे. तर विविध रोग व त्या रोगावर उपाययोजना याबाबत मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी ९७०२७९०४७२ व ८८२८१६४८४८ या नंबर वर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

### कळंबोली वसाहतीतून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** कळंबोली वसाहतीतून एक २८ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कळंबोली वसाहतीमधील फायर ब्रिगेड जवळून निरज सावंत (वय २८) ही बेपत्ता झाली असून तिचा बांधा सडपातळ, उंची चार फूट पाच इंच, केस काळे लांब, रंग सावळा, नाक लांब, चेहरा गोल, अंगामध्ये काळी जिन्स व गुलाबी टी-शर्ट व सोबत काळी पर्स आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक सचिन पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## नवी मुंबई भाजपतर्फे सफाई कामगारांचा सत्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेला स्वच्छ सर्वेक्षण २०२१मध्ये मिळालेल्या यशासाठी तुर्भे परिसरातील सफाई कामगारांचा भारतीय जनता पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष ॲड. रामचंद्र घरत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

'नवी मुंबई महानगरपालिकेला स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये १० ते ४० लाख लोकसंख्येच्या मोठ्या शहरांमध्ये प्रथम क्रमांक तसेच सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज अभियानात देशांतर्गत द्वितीय क्रमांक व कचरामुक्त शहराचे फाईव्ह स्टार तसेच वॉटरप्लस मानांकन' मिळाल्याच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्ष नवी मुंबईच्या वतीने तुर्भे परिसरातील मे. अमृत इंटरप्रायझेस गट क्रं ४६ च्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



सर्व कामगारांचा शाल व मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. रामचंद्र घरत, जिल्हाउपाध्यक्ष संकेत डोके, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शेट्टे, कमलेश भानुशाली, संतोष म्हात्रे, संतु रॉय, अमित चौथमोल व सफाई कर्मचारी सुपरवायझर अशोक तुकाराम पोष्टुरे, कृष्णा पाटील उपस्थित होते.

ॲड. रामचंद्र घरत यांनी सफाई कामगारांचे आभार मानले व त्यांच्या योगादानामुळेच नवी मुंबई महानगरपालिकेला हा सन्मान मिळाला असल्याचे प्रतिपादन केले. तसेच संकेत डोके यांनी आपल्या महापालिकेला मिळालेला हा सन्मान म्हणजे सर्व सफाईकामगार व तत्सम यंत्रणेचा सन्मान आहे व महापालिकेला मिळालेला हा सन्मान टिकवण्यासाठी आनखी जोमाने काम केले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

## ओएनजीसीकडून देशाचा अमृतमहोत्सव साजरा

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ओएनजीसी सीआयएसएफ उरण-मुंबईकडून देशाचा ७५वा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आरटीसी बँड पथकानी देश भक्तिपर गीत सादर केली.

देशाच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून ओएनजीसी मुंबई येथील कमांडर ललित शेखर झा व जेएनपीटी बंदराचे कमांडर विष्णु स्वरूप यांनी ओएनजीसी प्रकल्पाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सीआयएसएफच्या जवानांचा व बँड पथक जवानांचा गौरव केला.

या वेळी जेएनपीटी बंदराचे कमांडर विष्णू स्वरूप, उरण सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, उरण ओएनजीसी सिक्युरिटी इंचार्ज वीरेंद्र सिंह, भाजप-शिवसेना युतीच्या ग्रुप ग्रामपंचायत चाणजेचे सरपंच मंगेश थळी, डॉ. सुरेश पाटील, पोलीस निरीक्षक सुहास चौहान आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपनिरीक्षक दिलराज मीणा यांनी केले.




## स्थलांतरीत पक्ष्यांनी उरणचे खाडीकिनारे गजबजले

**उरण : वार्ताहर**

थंडीची चाहूल लागताच उरण परिसरातील विस्तीर्ण जलाशये, समुद्री खाड्या तसेच समुद्र खाडी किनाऱ्यावर विविध स्थलांतरीत पक्ष्यांची गर्दी वाढली आहे. या विविध प्रकारच्या आकर्षक पक्ष्यांमध्ये अग्निपंखी, पेलिकन, करकोचा, सिगल आदी स्थलांतरित पक्ष्यांबरोबरच काही दुर्मीळ पक्ष्यांचाही समावेश आहे.



उरण परिसरातील पाणजे, डोंगरी, बेलपाडा, दास्तान फाटा, रांजणपाडा, जसखार, बोकडवीरा-बीपीसीएल, नवीन शेवा आदी परिसरातील खाड्या, पाणथळी जागा, जलाशये आणि करंजा, पीरवाडी, माणकेश्वर, मोरा, खोपटा, घारापुरी, जेएनपीटी परिसरातील सागरी किनारे विविध प्रकारच्या आकर्षक जलचर पक्ष्यांनी गजबजून गेले आहेत. यामध्ये नीलबदक, पाणकोंबड्या, पाणकावळे, बगळे, सफेद व काळे करकोचे, खंड्या, शेकाट्या, पाणटिवळा, सारस आदी स्थानिक जलचर पक्ष्यांबरोबरच अग्निपंखी, पेलिकन, करकोचा, सिगल आदी स्थलांतरित पक्ष्यांचाही समावेश आहे.

मागील दोन वर्षांपासून मोठ्या संख्येने दिसणाऱ्या अग्नीपंखी (फ्लेमिंगो) पक्ष्यांची संख्या चांगलीच रोडावली होती. सातत्याने बदलत्या हवामानाचा परिणाम होत असल्यानेच अग्नीपंखींची संख्या कमी झाली असल्याचे पक्षीप्रेमींकडून सांगितले जात होते, मात्र काही पर्यावरण प्रेमी संस्थांच्या प्रयत्नानंतर येथील समुद्र खाड्या, पाणथळी क्षेत्रातील काही कंपन्यांनी बंद केलेले समुद्राच्या पाण्याचा प्रवाह पुन्हा एकदा सुरू झाला आहे. स्थलांतरित पक्ष्यांसाठी आवश्यक पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे येथील परिसरात विविध आकर्षक स्थलांतरित पक्ष्यांची गर्दी वाढत चालली असल्याची माहिती श्री एकवीरा आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष नंदकुमार पवार यांनी दिली.

उरणमधील समुद्र किनाऱ्यांवरील वाळूवरही विविध प्रकारचे जलचर पक्षी मोठ्या प्रमाणात नजरेत पडू लागले आहेत. या विविध आकर्षक पाहुण्या पक्ष्यांची गर्दी परिसरात वाढली आहे. परिसरातील पाणथळी जागा, खाडी, किनाऱ्यांवर स्वैरविहार करणाऱ्या रंगीबेरंगी विविध जातीच्या आकर्षक जलचर पक्ष्यांच्या मनमोहक हालचालींने परिसरातील वातावरणही चांगलेच प्रफुल्लीत झाले आहे.

## असंख्य भाविकांनी घेतले बाप्पाचे दर्शन

### अंगारक संकष्ट चतुर्थीचा साधला योग; मंदिरांत गर्दी

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेरच्या महागणपतीचरणी नतमस्तक होण्यासाठी नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी मंगळवारी (दि. २३) गर्दी केली होती.

निसर्गरम्य डोंगर कुशीत वसलेल्या उरण तालुक्यातील चिरनेर या गावावर निसर्ग देवतेची अविरत कृपा आहे. या गावात असणारे महागणपती देवस्थान चिरनेर गावचे ग्रामदैवत आहे. नवसाला पावणारा गणपती म्हणून चिरनेर गावातील महागणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे. या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी नेहमीच भाविकांची व पर्यटकांची गर्दी असते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेकांना श्रीच्या दर्शनापासून वंचित राहावे लागले होते. त्यांची ही इच्छा अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्ताने पुर्ण झाल्याने अनेक भाविकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती.



**उरण : वार्ताहर**

उरण येथील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या गणपती देवस्थान चरणी नतमस्तक होण्यासाठी करंजा, भवरा, हनुमान कोळीवाडा, केगाव, मोरा उरण येथील अनेक भक्तांनी मंगळवारी (दि. २३) गर्दी केली होती.

उरण शहरातील गणपती चौक येथील गणपती देवस्थान येथील मूर्ती सुमारे २०० ते २५० वर्षांपूर्वीची असल्याने अत्यंत सुंदर मंदिर असून या मंदिरात अष्टविनायक 'गणपतींचे दर्शन होते. लाकडावरील कोरीवकाम सुंदर असल्याने भाविक हे सर्व पाहून आनंदी होत असतात. नागरिक दर्शन घेऊनच बाजारपेठेत जात असतात. मंदिरा समोर दुर्वा, फुले दुर्व्यांचे हार, नारळ, फुलांचे हार आदींची दुकाने थाटण्यात आली होती. या मंदिरात रोज सकाळी ७ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती घेण्यात येते.

## संपादकीय

# बहुजनहिताय...?

भारतीय जनता पक्षाचे नेते गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा भिडवून लढा दिला. हे दोन्ही नेते आंदोलकांसोबत मुंबईच्या आझाद मैदानात ठिय्या देऊन बसले. परिवहन मंत्र्यांशी चालू असलेल्या चर्चेच्या फेऱ्यांमध्ये त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. परिवहन मंत्री अनिल परब यांनीही या दोन्ही नेत्यांचे योगदान मोठे असल्याचे मान्य केले. एसटी कर्मचाऱ्यांचा पाठिराखा पक्ष कुठला आहे हे त्यामुळे पुरेसे स्पष्ट झाले. वेतनवाढ झाल्यानंतरही संप मिटणार की नाही, याबद्दल साशंकता होती कारण अनेक कर्मचारी संघटनांनी विलिनीकरणाचा मुद्दा अजूनही सोडलेला नाही.

**कुठलेही आंदोलन रबरासारखे ताणू नये. ताणले तर ते तुटण्याची शक्यता असते असे उद्गार भारतीय जनता पक्षाचे आमदार सदाभाऊ खोत यांनी मंगळवारी काढले, तेव्हाच एसटी कामगारांच्या संपासंदर्भात तोडग्याच्या दिशेने पावले पडणार असल्याची चाहुल लागली होती, परंतु विलिनीकरणाच्या मुद्द्यावर एसटी कर्मचारी अडून बसले असून तो तिढा अजूनही कायमच आहे. विलिनीकरणाचा प्रश्न समितीच्या समोर असल्यामुळे आणि या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे हा निर्णय इतक्यात लागेल अशी शक्यता नव्हती, परंतु एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन मोडून काढण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने जे मार्ग अवलंबिले, त्यामुळे हा संप कमालीचा चिघळला. वास्तविक एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या अवाजवी म्हणता येणार नाहीत. पगार नियमित व्हावेत ही मागणीच मुळात दुर्दैवी म्हटली पाहिजे. नोकरी कुठेही असो, ती सरकारी असो वा खाजगी क्षेत्रातील, पगार वेळेवर करणे हे कर्तव्यच असते. एसटी कर्मचाऱ्यांना मात्र तुटपुंजा पगारदेखील कधीही वेळेवर मिळत नव्हता. बुधवारी झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांच्या बहुतांश मागण्या सरकारने मान्य केल्या. सगळ्यांचे पगार दर महिन्याच्या १० तारखेच्या आत होतील असे आश्वासन सरकारतर्फे देण्यात आले. १ ते १० वर्ष श्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी तब्बल सात हजाराची पगारवाढ करण्यात येणार आहे. उत्पन्न वाढल्यास चालक व वाहकाला इन्सेंटिव्ह देखील देण्यात येणार आहे. एकंदरीत एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये ४१ टक्के वाढ होईल असे दिसते. घसघशीत पगारवाढ झाली असली, तरी एसटी कर्मचाऱ्यांची विलिनीकरणाची मागणी मात्र मान्य करण्यात आलेली नाही. खरे पाहता हीच त्यांची प्रमुख मागणी होती. किंबहुना, राज्य सरकारने ज्या पगारवाढीची घोषणा केली ती पगारवाढ एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी कधी मागितलीच नव्हती. वेतनवाढ जाहीर केल्यानंतर देखील संप चालू राहणार असेल, तर सर्व मार्ग वापरून परिवहन सेवा सुरू करण्याचा गर्भित इशारा देण्यात आला आहे, असे समजते. याला इशारा म्हणायचे की धमकी, हे लढाऊ वृत्तीचे कर्मचारी ठरवतीलच. गेले २० दिवस सुरू असलेला हा लढा एसटी कर्मचाऱ्यांसाठी आरपारचा होता. सरकारने जाहीर केलेली वेतनवाढ देखील ऐतिहासिकच म्हणावी लागेल. या पगारवाढीमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर ६० कोटींचा बोजा अतिरिक्त पडणार आहे. हे महामंडळ गेल्या दोन वर्षांत पार डबघाईला गेले हे तर सत्यच आहे. त्यामागे कोरोनाचा फटका हे तर कारण आहेच, पण सरकारी दुर्लक्ष हे प्रमुख कारण आहे. पूर्वीप्रमाणे लालपरी गावोगाव धावावी आणि बहुजनहिताय बहुजनसुखाय हे घोषवाक्य तिने सार्थ करावे एवढीच जनसामान्यांची अपेक्षा आहे.**

# सुरेश लाड यांच्या राजीनाम्यामुळे राष्ट्रवादीची घडी विस्कळीत

**विश्लेषण**
विजय मांडे



काल कुणालाही कल्पना न देता तातडीची पत्रकार परिषद घेऊन माजी आमदार सुरेश लाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हाध्यक्षपदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. विशेष करून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे एका समारंभासाठी दिवेआगर येथे आले होते आणि त्याच वेळी लाड यांनी राजीनाम्याचे हत्यार उचलले. त्यामुळे उलटसुलट चर्चा होत आहे. राजीनाम्याचे कारण प्रकृतीचे असले तरी खरे कारण महाआघाडीमध्ये होत असलेली त्यांची घुसमट हे आहे. त्यांच्या या राजीनाम्यामुळे कार्यकर्ते संभ्रमात पडले असून मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसची बसलेली घडी मात्र विस्कळीत होईल, हे नक्की.

सुरेश लाड यांनी तीन वेळा विधानसभेमध्ये या मतदार संघाचे नेतृत्व केले. पाच वेळा निवडणूक लढवून ते दोन वेळा पराभूत झाले ते आघाडीतील बेबनावामुळे आणि काही अंशी त्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांच्या 'कर्तृत्वा'मुळे हे कटुसत्य आहे. मागच्या निवडणुकीतील त्यांचा पराभव त्यांच्या खूप जिव्हारी लागला. त्यातच नगर परिषदेतील नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत त्यांच्या कन्येचा पराभव हासुद्धा त्यांच्या मनाला डळमळीत करणारा ठरला. मागील विधानसभा निवडणुकीत 'शिवसेनेच्या वाटेवर' असताना त्यांची खासदार सुनील तटकरे यांनी समजूत काढून पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी त्यांना दिली. त्या वेळी ते निवडणूक लढविण्याच्या मनस्थितीत नव्हते. तरीही पक्षाचा आदेश म्हणून ते निवडणूक रिंगणात उतरले, परंतु त्यांचा पराभव झाला. या पराभवाची कारणे अनेक आहेत. आघाडीत असलेल्या शेकापने उघड उघड विरुद्ध काम केले. इतकेच नाही तर पक्षातील काही कार्यकर्त्यांनी सुद्धा आतून विरोधकांना मदत केली, तर कुणी म्हणते लोकसभेलाच हे सारे ठरले होते. काहीही असो लाडांची विजयाची हॅट्रिक मात्र हुकली हे खरे.

पराभवानंतर लाड यांनी पुन्हा काम सुरू केले. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली, मात्र त्याच वेळी नेमके कोरोनाचे महाकाय संकट आले. त्यामुळे पक्ष संघटनेचे काम करण्यात अडचण उभी राहिली. तरीही त्यांनी अनेक वर्षे पदे सांभाळत असलेल्या पदाधिकाऱ्यांना बढती दिली व नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली. त्यातच कोरोनाचे संकट हळूहळू कमी होऊ लागले. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका होण्याची शक्यता निर्माण झाली. उमेदवारांची चाचपाणीही सुरू झाली. काही विभागात बैठकाही सुरू झाल्या आणि या निवडणुका महाविकास आघाडी एकत्रित लढविणार असे जाहीर झाले. योगायोग असा की त्याच वेळी माजी आमदार लाड यांच्या पायावर शस्त्रक्रिया झाली. डॉक्टरांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. त्यामुळे जिल्ह्यातील प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचा दौराही पुढे ढकलण्यात आला. दरम्यान, खोपोली नगर परिषदेच्या निवडणुकीची चाचपणी सुरू झाली, मात्र लाड यांना कोणतीही कल्पना न देता काही पदाधिकाऱ्यांनी युती, आघाडीच्या बैठका घेतल्या. त्यामुळे लाड यांचा स्वाभिमान दुखावला. कोणाशीही युती किंवा आघाडी करण्यात माझा 'अडसर' नको म्हणून त्यांनी पद सोडण्याचा निर्णय पक्का केला आणि तो लगेचच तातडीची पत्रकार परिषद घेऊन जाहीरही केला. पत्रकार परिषदेत त्यांनी मी कोणतेही महामंडळ मागितले नाही आणि तरीही पक्षाने दिले तरी मी स्वीकारणार नाही. असे उत्तर दिल्याने ते किती नाराज आहेत ते दिसून येते, मात्र आगामी विधानसभा निवडणूक लढणार काय? यावरही त्यांनी 'अब तो दिल्ली बहोत दूर है।' असे सांगून तो विषय त्यांनी गुलदस्त्यातच ठेवलाय.

ते राजीनाम्याचे कारण प्रकृतीचे देत असले, तरी खरे कारण पक्षामध्ये होत असलेली घुसमटच आहे. महाविकास आघाडीची सत्ता असली तरी त्यांचे आणि विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांचे अद्यापपर्यंत कधीच जुळले नाही आणि पुढील किती दिवस असेच राहील हे सांगता येत नाही. कारण पत्रकार परिषदेत त्यांनी तशा भावना परखडपणे व्यक्त केल्या होत्या. लाड यांनी आपला निर्णय जाहीर करण्याचा दिवस सुद्धा असा निवडला की दिवेआगर येथे त्याच वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, सुनेत्रा पवार, खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे आदी समारंभात गुंतले असल्याने त्यांनी घेतलेल्या निर्णयापासून कुणीही त्यांना परावृत्त करू नये हाच त्यांचा हेतू होता. लाड यांच्या राजीनाम्यामुळे मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसची घडी विस्कटणार आहे. कर्जत तालुक्यात सुरेशभाऊ म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस अशी ज्या कार्यकर्त्यांची प्रामाणिकपणे भावना आहे, ते जो निर्णय घेतील तो आमच्यासाठी शिरसावंद्य आहे, अशी भावना असंख्य कार्यकर्त्यांची आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींपुढे मोठा पेच उभा राहिला आहे. आगामी निवडणुकांसाठी रिक्त असलेले पद लवकरात लवकर भरावे लागेल, मात्र राजीनाम्यामुळे मतदारसंघातील पक्षाची घडी बिघडणार आहे.

# खालापुरातून चोरीला गेलेल्या टँकरसह आरोपीला अहमदनगरमधून अटक

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापुरातून पाण्याचा टँकर चोरून नेणाऱ्या चौकडीला स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने नेवासा अहमदनगर येथून जेरबंद केले आहे. १० नोव्हेंबर रोजी पाण्याचा टँकर चोरी झाल्याबाबत फिर्याद टँकर मालकाने खोपोली पोलीस ठाण्यात दिली होती. गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू होता. गुन्हा घडला ठिकाणी घटनास्थळाच्या आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता चोरी गेलेला टँकर अहमदनगरच्या बाजूला गेलेला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, पोलीस हवालदार राजा पाटील, यशवंत झेमसे, प्रतीक सावंत, पोलीस नाईक राकेश म्हात्रे, देवराम कोरम यांच्या पथकाने खबऱ्याच्या मदतीने अहमदनगर गाठले.

टँकर चोरणारे आरोपी सचिन पोपट फुलारी (वय २९ रा. भेंडा बु. ता. नेवासा), महेश हरिचंद्र भेंडेकर (वय २३, रा. भक्तरपूर, ता. नेवासा, जिल्हा अहमदनगर), संदीप सर्जेराव जाधव (वय २९, रा. भक्तरपूर, ता. नेवासा, जिल्हा अहमदनगर), रोहिदास देविदास शिंदे (वय ३२, रा. मांडवे (तिसगाव) ता. नेवासा जि. अहमदनगर) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी टँकर चोरीची कबुली दिली. चोरीला गेलेला पाण्याचा टँकर जप्त करण्यात आला आहे.

# माणगाव तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव तालुका पत्रकार संघाचे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना सन २०२१ या चौथ्या वर्षातील पुरस्कार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी बुधवारी (दि. २४) सायंकाळी ४ वाजता झालेल्या पत्रकार संघाच्या बैठकीत जाहीर केले.

या वर्षीच्या सन २०२१ पुरस्काराचे मानकरी माणगाव तालुक्याच्या तहसीलदार श्रीमती प्रियांका आयरे कांबळे यांना आदर्शव्रत प्रशासकीय अधिकारी पुरस्कार, शांताराम खाडे यांना आध्यात्मिक क्षेत्र, चंद्रशेखर देशमुख यांना सहकार क्षेत्र, महादेवराव बक्कम यांना समाजभूषण, अ‍ॅड. केदार गांधी यांना विधी क्षेत्र, डॉ. प्रदीप इंगोले यांना वैद्यकीय सेवा, चंद्रकांत रोडे यांना आदर्श लोकप्रतिनिधी, राजनभाई मेथा यांना यशस्वी उद्योजक, नेहा दाखिणकर यांना आदर्श महिला सरपंच, मंगेश पोळेकर यांना तरुण उद्योजक, संजय गांधी यांना कोविड योद्धा, राजेंद्र तेटगुरे यांना आदर्श ग्रामसेवक, शंकर शिंदे यांना आदर्श शिक्षक, डॉ. आरिफ पागारकर यांना ज्येष्ठ पत्रकार, देवयानी मोरे यांना महिला युवा पत्रकार, किशोर मालुसरे यांना आदर्श तलाठी, लालासो वाघमोडे यांना कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस, रामदास जाधव यांना प्रगतशील शेतकरी पुरस्कार जाहीर करण्यात आले. या बैठकीला पत्रकार संघाचे सल्लागार मजिदभाई हाजिते, उपाध्यक्ष देवयानी मोरे, सल्लागार डॉ. आरिफ पागारकर, आजेश नाडकर, संघाचे सचिव सचिन देसाई, प्रवक्ता संतोष गायकवाड, सदस्य दीपक दपके आदी पत्रकार उपस्थित होते.

# मुरूड नगर परिषदेकडून मोकाट गुरांवर कारवाई

**मुरूड : प्रतिनिधी**

(छाया : संजय करडे)



नगर परिषदेने भटक्या मोकाट गुरांवर कारवाई करण्यास सुरुवात केली असून दस्तुरी नाका येथे एक मोठा कोंडवाडा तयार केला आहे. त्यामध्ये किमान आठ गुरे राहू शकतात अशी क्षमता आहे.

दिवसाला तीनशे रुपये दंड आकारण्याची प्रक्रिया मुरूड नगर परिषदेने सुरू केली आहे. पकडलेली बैल अथवा गाय सात दिवसाच्या आत न नेल्यास सदरची गुरे गो शाळेत नेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.त्यामुळे गुरांचे मालक धास्तावले आहेत.

नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट गुरे मालकांवर दांडात्मक कारवाईचे आदेश दिल्याने या धास्तीने गुरे मालकांनी आपापली गुरे घरीच बांधून ठेवण्याचे पसंत केले आहे. कारण आता गुरे रस्त्यावर येताच तातडीने नगर परिषद कर्मचारी या मोकाट गुरांचा ताबा घेतात.

शहरातील रस्त्यावर ठिकठिकाणी भटक्या मोकाट गुरांच्या कळपामुळे वाहतूक कोंडी होऊन आर्थिक नुकसान व सामान्य नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत होते.

मुरूड शहरातील एकदरा पूल परिसर, गणेश पाखाडी नाका, दस्तुरी नाका, बाजारपेठ, आझाद चौक, मधली आळी, मारुती नाका आदी परिसरात मोकाट गुरांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात होते. गुरांच्या वाढत्या उपद्रवाबाबत स्टार फाऊंडेशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष जाहिद फकजी यांनी मुरूड नगर परिषदेला रीतसर निवेदन दिले होते. त्यांनी गुरांच्या वाढत्या उपद्रवाबाबत तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली होती.

जाहिद फकजी यांनी पुढे सांगितले की, गुरे पकडण्याची मोहीम तीव्र गतीने व लोकांच्या मागणीला प्राधान्य दिल्याबद्दल समस्त शहरवासीयांतर्फे मुरूड नगर परिषद मुख्याधिकारी आणि कर्मचारीवृंदाचे आभार व्यक्त करतो.

आता कुत्र्यांची संख्यासुद्धा वाढलेली आहे. भटके कुत्रे निर्दोष व्यक्तीला चावा घेण्याच्या घटना सुद्धा घडलेल्या आहेत. त्यामुळे या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात यावे. मुरूड शहर हे पर्यटन स्थळ असून येथील वाढत्या पर्यटक संख्येस मोकाट गुरांचा त्रास सहन करावा लागत होता. आता नगर परिषदेने कार्यवाही सुरू केल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# चारफाटा ते डिकसळ मार्गावर पोलीस बीट उभारण्याची मागणी

**कर्जत : बातमीदार**



कर्जत पोलीस ठाणे अंतर्गत कर्जत–कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर डिकसळ ते चारफाटा या दरम्यान पोलीस बीट सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद यांनी ही मागणी कर्जतचे पोलीस उपअधीक्षक यांच्याकडे केली आहे.

माथेरान या पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या आणि कर्जत तालुक्यातून ठाणे–मुंबई कडे जाणाऱ्या कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असतात. त्याच वेळी कर्जत आणि नेरळ पोलीस ठाणे यांची सीमा असलेल्या या परिसरात भिवपुरी रोड रेल्वे स्टेशन असून या परिसरात सतत चोरीच्या घटना घडत असतात आणि अपघातांची मालिका सुरूच आहे. त्यामुळे स्थानिक रहिवासी, ग्रामस्थ आणि वाहनचालक यांना दिलासा देण्यासाठी रायगड पोलिसांनी कर्जत आणि नेरळ पोलीस ठाणे अंतर्गत बीट चौकी उभारावी. त्यामुळे चोरीच्या घटनांना आळा बसेल आणि अपघात घडत असताना मदत करणे सोपे होऊ शकते. रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद यांच्याकडून ही मागणी करण्यात आली आहे.

रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद यांच्याकडून रायगड जिल्हा पोलीस उपअधीक्षक विजय लगारे यांना देण्यात आली. या वेळी रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदचे सरचिटणीस अ‍ॅड. सुशील महाडिक, उमरोली ग्रामपंचायत सदस्य भास्कर लोंगले, संदीप मोरे, रूपेश मोरे, योगेश थोरवे, विक्रम मोरे आदी उपस्थित होते. सदर मार्गावरील विविध कॉम्प्लेक्समध्ये पोलीस गस्त वाहनद्वारे दिवसातून कमीत कमी दोन वेळा पाहणी करावी, अशी मागणी बहुजन विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

# भरकटलेल्या कासवाला पालीत तरुणांनी दिले जीवदान

**पाली : प्रतिनिधी**



सुधागड तालुक्यातील पाली तहसील कार्यालयाबाहेर रस्त्यावर रात्री काही तरुणांना एक भरकटलेले कासव दिसले. या तरुणांनी ताबडतोब शिवऋण प्रतिष्ठान या व्हॉट्सअप ग्रुपवर ही माहिती कळवली व कासवाला वाचविण्याचे आवाहन केले. त्यानंतर पालीतील शंतनु लिमये या प्राणीमित्र युवकाने तेथे जाऊन कासवाला ताब्यात घेतले. त्यानंतर या कासवाला सुरक्षितपणे विहिरीमध्ये सोडले, अशी माहिती शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्रचे उपाध्यक्ष केतन म्हस्के यांनी दिली.

शिवऋण प्रतिष्ठान नेहमीच सामाजिक व सेवाभावी कार्यात अग्रेसर राहिले आहे, सजीव व जीवसृष्टी टिकली पाहिजे यासाठी पदाधिकारी महत्त्वपूर्ण काम करतात. दयानंद माने, अमोल त्रिभुवन व त्यांच्या सहकाऱ्यांना हे कासव दिसले होते. वाहनांच्या धडकेत किंवा इतर प्राण्यांच्या आक्रमणामुळे या कासवाच्या जीवाला धोका होता. त्यामुळे त्यांनी प्रसंगावधान दाखवून ही माहिती सोशल मीडियावर कळवली. त्यानंतर लागलीच चांगला प्रतिसाद मिळाला व कासवाचे प्राण वाचू शकले.

# माणगाव स्फोटातील मुलाची प्रकृती स्थिर

## २५ हातबॉम्ब सुरक्षित ठिकाणी हलविले

**माणगाव : प्रतिनिधी**

मच्छी व जंगली जनावरे मारण्यासाठी तयार करण्यात आलेले गावठी हातबॉम्ब हाताळत असताना त्याचा मंगळवारी (दि. २३) अचानक स्फोट होऊन यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या १० वर्षाच्या मुलाची प्रकृती स्थिर असून जखमी महिलेचीही प्रकृती स्थिर आहे. या घटनेत झाडाजवळ सापडलेले २५ गावठी हातबॉम्ब रायगड पोलिसांनी दक्षता घेत बॉम्ब शोधक व नाशक पथक रायगड अलिबाग यांच्या मदतीने माणगाव तालुक्यातील निजामपूर येथील मॅगझीन (स्फोटक ठेवण्याची सुरक्षित जागा) या ठिकाणी हलविण्यात आले आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतर या बॉम्बची विल्हेवाट लावण्यात येईल, असे पोलीससूत्रांनी अधिक माहिती देताना सांगितले.

# खोपोली चिंचवलीत पाच दुकाने फोडली

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील चिंचवली शेकीन येथे आयटीआय समोरील इमारतीतील चार ते पाच दुकाने अज्ञात चोरट्यांनी फोडण्याचा प्रकार मंगळवारी रात्री घडला. दुकानदारांनी याबाबत तक्रारच दिली नसल्याने, किती माल चोरीस गेला हे समजू शकले नाही. यासंदर्भात पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्याशी संपर्क साधला असता, घटना घडल्याबाबत दुजोरा दिला, मात्र काहीच माल चोरीस गेला नसल्याने त्यांनी सांगितले. दरम्यान, या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनीही या परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी पुढे येत आहे.



# रेशन दुकानदारांचा बंद स्थगित

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे अन्नपुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी रेशन दुकानदारांच्या मागण्या सोडविण्याचे आश्वसान दिल्यामुळे अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाने १ डिसेंबरपासून पुकारलेला बंद स्थगित करण्यात आला आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष डी. एन. पाटील यांनी अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

राज्यभरातील स्वस्त धान्य दुकानदारांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा किंवा वर्ल्ड फुड प्रोग्राम अंतर्गत शिफारस केल्याप्रमाणे प्रतिक्विंटल १७० रुपये कमिशन मिळावे. ई–पॉझ मशीन नवीन व्हर्जनसह देण्यात याव्यात. रेशन दुकांनामध्ये दिला जाणारा निकृष्ट दर्जाचा जास्त कणी असलेला तांदूळ तपासणी करून अहवाल मागविण्यात यावा. ज्या कार्डधारकांना कोणत्याही योजनांर्तगत धान्य दिले जात नाही अशा कार्डधाराकांची गावनिहाय यादी तयार करून केंद्र सरकारकडे पाठवावी, आदी मागण्या अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाने राज्य शासनाकडे केल्या होत्या.

राज्यातील रेशन दुकानदारांनी १ डिसेंबरपासून दुकान बंद ठेवण्याचा इशारा दिला होता. अन्नपुरवठा मंत्री छगन भूजबळ यांच्याशी २३ नोव्हेंबर रोजी आमच्या प्रतिनिधींनी चार्चा केली. त्या वेळी त्यांनी या सामस्या सोडविण्याचे आश्वसन दिले. त्यामुळे बंद स्थगित करण्याचा निर्णय घेताला आहे, असे डी. एन. पाटील यांनी सांगितले. संघटनेचे सेक्रेटरी चंद्रकांत यादव, रायगडचे अध्यक्ष प्रमोद घोसाळकर आदी या वेळी उपस्थित होते.

# माथेरानला पर्यावरणपूरक वाहतूक सुरू करण्यासाठी सनियंत्रण समिती अनुकूल

**कर्जत, माथेरान : बातमीदार**

माथेरान हे वाहनमुक्त शहर असल्यामुळे प्रदूषण नाही त्यामुळे वेगळा नावलौकिक मिळालेले पर्यटनस्थळ माथेरानमध्ये पर्यावरण पूरक बदल घडत आहेत. येथील पर्यावरण जपत आता ई-रिक्षा वाहतूक सुरू करण्यासाठी सनियंत्रण समिती अनुकूल असून माथेरानचे पर्यावरण हे मुख्य वैशिट्य जपत हा बदल केला जाणार आहे. दुरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीतून हे संकेत मिळत आहेत.त्यामुळे येथील विद्यार्थी, दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे.





याबाबत सनियंत्रण समितीने याचिकाकर्ते सुनील शिंदे यांच्यासोबत चर्चा करून तेथील वाहतूक समस्या सोडवण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते. त्या अनुषंगाने काल महत्त्वपूर्ण बैठक झाली. हातरिक्षा चालकांची अमानवीय प्रथेतून मुक्ती झालीच पाहिजे. त्यांना आरोग्यदायी व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळाली पाहिजे. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांना कायद्याने दिलेला वाहतुकीचा अधिकार मिळाला पाहिजे, गॅस सिलिंडर टाकीसाठी दीडशे ते दोनशे रुपये जास्त मोजावे लागतात, फळ भाज्या, दूध पाणी सर्वच वस्तूंवर जास्त पैसे मोजावे लागतात. हे प्रश्न कायमस्वरूपी सुटले पाहिजेत, अशी मागणी याचिकाकर्ते सुनील शिंदे यांनी केली. यावर समितीचे सदस्य पर्यावरण खात्याचे डॉ. दिनेश कुमार, डॉ. जॉय ठाकूर, पर्यावरण तज्ज्ञ डेविड कार्डोझ, अध्यक्ष के. पी. बक्षी व सचिव तथा जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सविस्तर चर्चा केली.

माथेरानची भौगोलिक रचना, येथील प्रचंड चढ उताराचे रस्ते व हे सर्व करताना रिक्षा चालक व घोडेवाले यांचा रोजगार बुडणार नाही याची काळजी घेत पर्यावरण पूरक व्यवसाय कसा निर्माण करता येईल याचा गांभीर्याने विचार केला जाईल, असे मत समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी व्यक्त केले व काल झालेल्या बैठकीचा सविस्तर आढावा मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. माथेरानच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांनी समितीला उत्तम प्रकारे ई-रिक्षा तथा सीएनजीचे फायदे-तोटे समजून सांगितल्याने ते उपयोगी ठरले. नगराध्यक्ष प्रेरणा सावंत यांनीदेखील पालिकेचे पूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली आहे. या वेळी श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, शिक्षक तथा वन समिती योगेश जाधव आदी बैठकीसाठी जिल्हाधिकारी दालनात उपस्थित होते.

## भाजप दक्षिण भारत सेलची कर्जतमध्ये बैठक

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या दक्षिण भारत सेलची कर्जत मंडळ बैठक मंगळवारी (दि. २३) उत्साहात झाली. कर्जत येथील संत सेवालाल नगर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी प्रामुख्याने गुलबर्गा, यादीर, वाडी, कर्नाटक आणि तेलंगणा राज्यातील तंदूर भागातील १०० हून अधिक दक्षिण भारतीय बंजारा कुटुंबे राहात आहेत.

या बैठकीला जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा निमंत्रक श्रीनिवास कोडुरू, कर्जत शहर भाजपा अध्यक्ष आणि नगरसेवक बळवंत बुमरे, जिल्हा समिती सदस्य श्रीनिवास राव, भाजप कार्यकर्ते सरस्वती चौधरी, दिनेश, कुट्टी आदी उपस्थित होते.

या बैठकीत पाण्याचे कनेक्शन, शौचालयाची सुविधा, पथदिवे, अर्धवट ड्रेनेज, ज्येष्ठ नागरिक कार्ड, बेरोजगारी आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. भाजप नगरसेवक लवकरात लवकर कॉलनीला भेट देऊन



उपस्थित केलेल्या समस्यांसाठी काम करतील, असे आश्वासन जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे यांनी दिले.

## डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील लोणेरे विद्याविहार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठासमोरील प्रांगणात शुक्रवारी (दि. २६) दुपारी २ वाजता राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित यांनी ही माहिती दिली.

## शिक्षणामुळेच आपल्यामध्ये सुधारणा होते -विक्रम देशमुख

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रत्येकाने आपला मुलगा किंवा मुलगी असेल त्यांना शिकवले पाहिजे. शिक्षणामुळे आपल्यामध्ये सुधारणा होते, असे मार्गदर्शन कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांनी केले. उमरोली ग्रामपंचायत हद्दीतील आशाणे वाडीमध्ये तहसीलदार विक्रम देशमुख यांनी भेट दिली. या वेळी कर्जत पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, सामाजिक कार्यकर्त्या मोनिका बडेकर, उद्योजक निलेश बडेकर उपस्थित होते. वाडीमध्ये बारावी किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण घेतलेल्या विजय भालचंद्र सांबरी, महेंद्र गणू सांबरी आणि राजेश महादू सांबरी या तीन मुलांचा तहसीलदार विक्रम देशमुख यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या वेळी गावातील एक अपंग मुलगी

(छाया : विजय मांडे)



काजल रामदास पाचअंगे (वय ६) हिला तहसीलदार विक्रम देशमुख यांनी दत्तक घेतले आहे. तिच्या उपचाराचा खर्च ते करणार आहेत.

तहसीलदार विक्रम देशमुख यांनी वाड्यातील समस्या जाणून घेतल्या. त्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले आदिवासी पाड्यांमध्ये फक्त स्त्री काम करताना दिसते. पुरुष नशा करतात किंवा पत्ते खेळत असतात. मोबाइलवर गाणे ऐकतात किंवा पब्जी खेळत असतात. माझी सगळ्यांना एक विनंती आहे की, मुलांना शिक्षण द्या. प्रत्येकाच्या आयुष्यात बदल होत असेल, तर तो बदल शिक्षणानेच होतो, असे सांगितले. कोणाला एमपीएससी करायचे असेल, कोणाला पोलीसमध्ये भरती व्हायचे असेल किंवा कोणाला सैन्यामध्ये भरती व्हायचे असेल, तर त्यासाठी मी मदत करेन, असे सांगून, व्यसन करू नका, व्यसन सोडून द्या, स्वच्छतेला लागा, मुलांना शिक्षण द्या, मोबाइलचे व्यसन सोडून द्या, असेही त्यांनी शेवटी सांगितले.

## मुलांच्या विविध समस्यांवर अलिबागमध्ये आज परिसंवाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय बालरोग संघटना रायगड शाखेच्या वतीने गुरुवारी (दि. २५) पीएनपी नाट्यगृह अलिबाग येथे सायंकाळी ५ वाजता 'मुले अशी का वागतात' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यात राज्यातील नामांकीत डॉक्टर पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

कोविड परिस्थिती, बदलती कुटुंब व्यवस्था, समाज माध्यमांचा भडिमार, टोकाची स्पर्धा आणि पालकांच्या मुलांकडून वाढत्या अपेक्षा यामुळे लहान मुलांमध्ये अनेक प्रकारच्या वर्तन समस्या निर्माण होत आहेत. अशा वेळी पालकांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. ही बाब लक्षात घेऊन राष्ट्रीय बालरोग संघटनेच्या रायगड शाखेच्या वतीने या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.



या परिसंवादाला जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, नगराध्यक्ष प्रशांत नाईक उपस्थित राहणार आहेत, तर डॉ. जयंत पंढरीकर (अलिबाग), डॉ. निवेदिता पाटील (कोल्हापूर), डॉ. अमोल अन्नदाते (वैजापूर), डॉ. राजीव धामणकर (अलिबाग) आणि डॉ. चंद्रशेखर दाभाडकर (महाड) हे बालरोग तज्ज्ञ उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. हा परिसंवाद सर्वांसाठी खुला असून जास्तीत जास्त पालक आणि शिक्षकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिसंवादाचे संयोजक डॉ. विनायक पाटील, डॉ. राजेंद्र चांदोरकर आणि डॉ. निशिगंध आठवले यांनी केले आहे.

## काशीद येथे बालरोगतज्ज्ञांचे अधिवेशन

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद येथे २६ ते २८ नोव्हेबर या कालावधीत महाराष्ट्र, गोवा व गुजारत या तीन राज्यांतील बालरोगतज्ज्ञांचे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.



भरतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या रायगड शाखेच्या यजमानपदाखाली हे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात बालकांच्या समस्यांवर चार्चासत्र, परिसंवाद व व्याख्याने होणार आहे. शुक्रवारी २६ नोव्हेबर रोजी या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती डॉ. चंद्रशेखर दाभाडकर यांनी अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

ग्रामीण व शहरी भगातील वैद्यकीय सेवेतील तफावत कशी भरून काढता येईल, या विषयावर डॉ. महेश मोहिते आपले विचार मांडणार आहेत, तर आदिवासी मुलांच्या समस्या या विषयावर डॉ. पुखराज बाफना यांचे भाषण होईल. कोविड १९ या आजारावर एक परिसंवाद होणार आहे. या आजाराचे त्वरित व दूरगामी होणारे परिणाम, उपचारपद्धती व लसीकरण यावर विस्तृत चर्चा होणार आहे.

बालरोगतज्ज्ञ रायगड शाखेचया अध्यक्ष डॉ. सुनीता इंगळे, डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, डॉ. हेमंत गंगोलीया, डॉ. जय भांडारकर, डॉ. विनायक पाटील, डॉ. राजेंद्र चांदोरकर, डॉ. प्रमोद वानखेडे, डॉ. सुनील शेठ, डॉ. आबासाहेब पाटणकर, डॉ. निलिमा भांडारकर, तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व बालरोगतज्ज्ञ या अधिवेशनाची तयारी करीत आहेत.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. बाळाराम गोमा भोपी,** रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन :**
**मौजे - चिंचवण, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स. नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३१ | १ | ०-१९-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-२०-०० | १.३४ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २४/११/२०२१**

**सही/-**
**अॅड. एस. के. राणे**
पत्ता:- शॉप नं. १२३, म्युन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.
मोबा. नं. ९८१९८६९२१२
खरेदीदाराचे वकील



वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर



महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सा.बां. विभाग, पनवेल**
**पिन कोड-४१० २०६.**

**दूरध्वनी क्रमांक- ०२२-२७४५२७७८** | ई-मेल-panvel.ee@mahapwd.com | **फॅक्स नंबर ०२२-२७४६७४४०**

**जा.क्र. पनवेल/लेशा/निविदा/४०४८** **दिनांक : १७/११/२०२१**

**ई-निविदा सूचना क्र. ५६ सन २०२१-२२** (फेर निविदा-२)

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पनवेल दूरध्वनी/फॅक्स क्रमांक- ०२२ - २७४५२७७८/०२२ - २७४६७४४० महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे कंत्राटदाराला खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु. लक्ष) | इसारा रक्कम (रुपये) | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत जीएसटी धरून | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कामाचे लेखाशिर्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुरबाड कर्जत चौक लोहोप रस्ता रामा - ८९ किमी १२२/४५० येथे उल्हास नदीवर पुलाचे बांधकाम करणे. ता. कर्जत, जि. रायगड | ६१३.०५ | ३०७०००/- | अनिवार्य नाही | ३३६०.०० | १८ महिने | (५०५४०३४९) - ०३ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २३.११.२०२१ ते दिनांक ०३.१२.२०२१
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक ०७.१२.२०२१ अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ यांचे कार्यालयात दु. १५.३० उघडण्यात येईल.
निविदा पूर्व बैठक : दिनांक २९.११.२०२१ दुपारी १५.०० वाजता मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग (कोकण), मुंबई यांचे कार्यालय

**निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

**टिप :-**
१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली **https://mahatenders.gov.in**
२. निविदाकारांना नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजिटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर Enrollment करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
**Toll Free No : 1800 3070 2232, E-Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in**
३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्ताऐवजाच्या मुळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत नुसार करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.
४. सादर केलेल्या निविदा कागदपत्राची प्रत : स्वतंत्र पाकिटात दिनांक ०३.१२.२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.
५. शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकारांचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security)चा DD/FDR/B.G. लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकाराची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व सदर निविदाकारास पूर्ण एक वर्षासाठी कोणत्याही निविदा प्रक्रियेस सहभागी होता येणार नाही तसेच अशा निविदा नव्याने मागविण्यात येतील.
६. इतर अटी व शर्ती ई-निविदेमध्ये पाहावयास मिळतील.
७. सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
वरील कामाची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाइटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग, पनवेल**



**उरण नगरपरिषद, उरण**
**निविदा सूचना**

जा.क्र.उनप/आरोग्य/२७७५/२०२१-२२
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :- २३/११/२०२१

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामांकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत मोरा ओपण प्लेस येथे डंपर व मनुष्यबळ पुरविणेबाबत विचार विनिमय करणे. | २०००/- | २००/- |
| २. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील मोरा ते कुंभारवाडापर्यंत सार्वजनिक शौचालयांना लोखंडी दरवाजे बसविणेबाबत विचार विनिमय करणे. | २०००/- | २००/- |
| ३. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील कुंभारवाडा ते उरणपर्यंत सार्वजनिक शौचालयांना लोखंडी दरवाजे बसविणेबाबत विचार विनिमय करणे. | २०००/- | २००/- |

**अटी/शर्ती :-**
१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक २५/११/२०२१ ते दिनांक ६/१२/२०२१ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०:०० ते सायं. ५:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक २५/११/२०२१ ते दिनांक ०६/१२/२०२१ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोनस लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक ८/१२/२०२१ रोजीचे दुपारी ४:०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५:०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

**सही/-**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



**उरण नगरपरिषद, उरण**
**निविदा सूचना**

जा.क्र.उनप/आरोग्य/२७७४/२०२१-२२
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :- २३/११/२०२१

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामांकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषदेच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घंटागाडीवर GPS सिस्टीम बसविणे. | २५००/- | ५००/- |
| २. | उरण नगरपरिषदेच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत HOME COMPOSTER BIN पुरविणे. | ५०००/- | १०००/- |
| ३. | उरण नगरपरिषदेच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत ORGANIC WASTE COMPOSTER BIN पुरविणे. | ५०००/- | १०००/- |
| ४. | उरण नगरपरिषदेच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेबाबत जनजागृती संदर्भात शहरातील भिंती चित्रे रंगविणे. | ५०००/- | १०००/- |
| ५. | उरण नगरपरिषदेच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेबाबत जनजागृती संदर्भात डिजिटल बॅनर, हॅन्ड बिल छपाई करणे व शहरात ठिकठिकाणी लावणे. | ५०००/- | १०००/- |
| ६. | उरण नगरपरिषदेच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेबाबत जनजागृती करणेकरिता पथनाट्य सादर करणे तसेच सभा व प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे, स्वच्छतेबाबत जिंगल तयार करणे, स्वच्छतेबाबत विविध स्पर्धांचे आयोजन करणे. | ५०००/- | १०००/- |
| ७. | उरण नगरपरिषदेच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत शहरातील हवेचे मोजमाप करण्यासाठी सयंत्र बसविणे. | ५०००/- | १०००/- |
| ८. | उरण नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन केंद्रावर ओल्या कचऱ्यावर कंपोस्टींद्वारे प्रक्रिया करण्यासाठी HDPE COMPOST BAGS १२ FT X ४FT X १FT पुरविणे. | ५०००/- | १०००/- |

**अटी/शर्ती :-**
१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक २५/११/२०२१ ते दिनांक ०६/१२/२०२१ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी ११:०० ते सायं. ०५:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक २५/११/२०२१ ते दिनांक ०६/१२/२०२१ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोनस लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक ०८/१२/२०२१ रोजीचे दुपारी १:०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५:०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

**सही/-**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

# आजपासून न्यूझीलंडविरुद्ध पहिली कसोटी





## श्रेयस अय्यर करणार पदार्पण

**कानपूर : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना गुरुवार (दि. २५) पासून कानपूर येथील ग्रीन पार्क स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत क्लीन स्वीप केल्यानंतर आता भारताची नजर कसोटी मालिकेवर आहे, मात्र पहिल्या कसोटी सामन्यात रोहित शर्मा आणि नियमित कर्णधार विराट कोहलीला विश्रांती देण्यात आली आहे, तर के. एल. राहुल दुखापतीमुळे बाहेर गेला आहे. त्यामुळे नव्या खेळाडूंना संधी मिळणार आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या कसोटीत टीम इंडियाचे नेतृत्व अजिंक्य रहाणेकडे आहे. अजिंक्यने श्रेयस अय्यर कसोटी पदार्पण करणार असल्याचे जाहीर केले आहे. भारताचा अनुभवी सलामीवीर के. एल. राहुल मांडीच्या दुखापतीमुळे मालिकेला मुकणार आहे. राहुलच्या जागी सूर्यकुमार यादवचा संघात समावेश करण्यात आला असून तो आणि श्रेयस अय्यर या दोन मुंबईकरांपैकी एकाला कसोटी पदार्पणाची संधी मिळण्याची दाट शक्यता आधीच वर्तवण्यात येत होती.

टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून राहुल द्रविडची ही पहिलीच कसोटी मालिका आहे. त्याची नजर आता कसोटीतही क्लीन स्वीपवर असेल. ग्रीन पार्क स्टेडियमच्या मैदानावर भारतीय संघाची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. न्यूझीलंडला येथे कधीही भारताला हरवता आलेले नाही. टीम इंडियाने ग्रीन पार्क येथील शेवटच्या सहापैकी पाच कसोटी सामने जिंकले. येथे भारताचा शेवटचा पराभव १९८३मध्ये वेस्ट इंडिजकडून झाला होता. भारतीय संघ या मैदानावर ३८ वर्षांपासून अजिंक्य आहे.



## विराट करतोय जोरदार सराव

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषकानंतर विराट कोहली दीर्घ रजेवर गेला होता. तो न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिकेतही खेळला नाही. २५ नोव्हेंबरपासून कानपूर येथे होणाऱ्या पहिल्या कसोटीतदेखील तो भाग घेणार नाही. त्याला विश्रांती देण्यात आली आहे, परंतु ३ डिसेंबरपासून मुंबईत सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीत तो संघात पुनरागमन करेल.

विराट कोहलीचे जोरदार सराव करतानाचे फोटो, व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. न्यूझीलंडविरुद्ध खेळताना शतकाचा दुष्काळ संपवण्याचा विराटचा प्रयत्न असेल.

## आरोग्य प्रहर

### पाणी पिण्याचे काही नियम

तहान लागण्यापूर्वी पाणी पिणे आवश्यक आहे. तहान लागण्याचा अर्थ असा की, तुमच्या शरीरात पाण्याची कमतरता आहे. म्हणून तहान लागण्यापूर्वीच पाणी पिणे हे आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते. शरीरात पाण्याची कमतरता असणे हे आरोग्यासाठी हानिकारक आहे. हे आपण सगळेच जण जाणतो, परंतु आपणांस हे माहीत आहे का की, पाणी पिण्याची पद्धत जर योग्य नसेल तर तेही खूप हानिकारक ठरू शकते. त्यामुळे पाणी कधी आणि कसे प्यायला हवे हेदेखील जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. यात कोणत्या गोष्टी योग्य आणि कोणत्या अयोग्य हेदेखील जाणून घेणे आवश्यक आहे.



**उभे राहून कधीही पाणी पिऊ नये –** आपण नेहमीच ऐकले असेल की, उभे राहून पाणी पिऊ नये. पण बऱ्याच जणांना या मागचे नेमके कारण माहित नसेल. वास्तविक, उभे राहून पाणी प्यायल्यास ते घशातून थेट पोटातील खालच्या भागात जाते. त्यामुळे पाण्यातील आवश्यक असे पोषकद्रव्य शरीराला मिळत नाही.

**सकाळी रिकाम्या पोटी भरपूर पाणी पिऊ नका –** सकाळी रिकाम्या पोटी पाणी पिणे खूप फायदेशीर आहे. पण पाण्याचे प्रमाण हे एक लिटर पेक्षा देखील कमी असावे, परंतु लक्षात ठेवा की, जर एखाद दिवशी आपण अचानक सकाळी एक लिटर पाणी पिल्यास ते खूप हानीकारक ठरू शकते.

**खाण्याबरोबर पाणी पिणे हानिकारक –** जर तुम्हाला खाण्याबरोबरच पाणी पिण्याची सवय असेल तर ही सवय तुमच्यासाठी खूप हानिकारक आहे. वास्तविक, अन्नाबरोबर पाणी प्यायल्यामुळे पोटातील गॅस वाढतो अन्न पचन होण्यास त्रास होतो. म्हणून, खाण्यापूर्वी अर्धा तास किंवा नंतर पाणी प्यावे.

**व्यायाम आणि कसरतीदरम्यान पाणी कसे प्यावे? –** व्यायामाच्या वेळी किंवा वर्कआउट करताना दरम्यान तुम्ही किती पाणी पितात आणि ते कसे पिता यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. व्यायाम करताना तहान लागणे हे स्वाभाविक आहे. परंतु जर आपण एका घोटापेक्षा अधिक पाणी प्याल तर ते खूप हानिकारक ठरू शकते. त्यामुळे व्यायाम केल्यानंतर किमान एक तासानंतर पाणी प्यावे. एक-एक घोट पाणी प्याल्यास डिहायड्रेशन होणार नाही.

**फ्रिजमधील थंड पाणी घटाघट पिऊ नये –** जर तुम्हाला थेट फ्रीजमधून बाटली घेऊन घटाघट पाणी पिण्याची सवय असेल तर ही सवय तुम्हाला खूप नुकसान पोहचवू शकते. अशाप्रकारे पाणी पिण्याची सवय ही आपल्या आरोग्यासाठी चांगली नाही.

# आगामी आयपीएल २ एप्रिलपासून?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२२चे वेळापत्रक जवळपास निश्चित झाले आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून टी-२० लीगचा नवा हंगाम सुरू होऊ शकतो. या वेळी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) टी-२० लीगचा संपूर्ण हंगाम देशातच होणार असल्याचे आधीच जाहीर केले आहे.



क्रिकबझच्या बातमीनुसार आयपीएल २०२२चा हंगाम २ एप्रिलपासून सुरू होऊ शकते. पहिला सामना चेन्नईत होणार आहे. या वेळी सामने वाढल्यामुळे ही लीग ६० दिवसांपेक्षा जास्त काळ चालू शकते. ४ किंवा ५ जूनला अंतिम सामना खेळवला जाऊ शकतो, मात्र सर्व संघांना पूर्वीप्रमाणे १४-१४सामने खेळावे लागणार आहेत. ७ सामने घरच्या मैदानावर, तर ७ सामने घराबाहेर खेळवले जातील.

महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जने आयपीएल २०२१चे विजेतेपद पटकावले. अशा स्थितीत गतविजेता असल्याने त्यांना सलामीच्या सामन्यात संधी मिळेल. येणाऱ्या हंगामात आठऐवजी १० संघ मैदानात उतरतील. दोन नवीन संघ जोडल्याने सामन्यांची संख्या ६० वरून ७४वर जाईल.

सलामीच्या लढतीत चेन्नई सुपर किंग्जचा सामना कोणत्या संघाशी होईल हे अद्याप निश्चित झालेले नाही. पण पूर्वीप्रमाणेच त्याची टक्कर मुंबई इंडियन्सशी असू शकते, असे मानले जात आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबईने सर्वाधिक वेळा टी-२० लीगचे विजेतेपद पटकावले आहे. सीएसकेने चार वेळा विजेतेपद पटकाविले आहे.

## खेलो इंडिया युथ गेम्स

# जिल्हास्तरीय खो-खो निवड चाचणी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

चौथ्या खेलो इंडिया युथ गेम्स हरियाणा २०२२करिता महाराष्ट्र राज्याचे संघ सहभागी होणार आहेत. त्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणी व स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. खो-खो या खेळाची स्पर्धा येत्या २६ व २७ नोव्हेंबर रोजी अलिबाग नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे.

या स्पर्धेसाठी वयोगट १८ वर्षाखालील मुले व मुली असा राहील. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील शाळा-क्लब यांचे संघ सहभाग घेऊ शकतात. संघ नसलेल्या शाळेतील-क्लबमधील खेळाडू तसेच शाळाबाह्य खेळाडू निवड चाचणीमध्ये सहभाग घेऊ शकतात. सहभागी होण्यासाठी संघ-खेळाडूंनी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज २५ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत ८८५६०९३६०८ या व्हॉट्सअपवर किंवा raigadgamesgmail.com या ईमेल-वर पाठवावे. सहभागी होणारा खेळाडू १ जानेवारी २००३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. खेळाडूकडे आधारकार्ड, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (दहावी बोर्ड सर्टीफिकेट), जन्मप्रमाणपत्र (पाच वर्षांपूर्वी काढलेले) यापैकी किमान दोन कागदपत्रे असणे बंधनकारक आहे.

या स्पर्धा निवड चाचणीचे आयोजन खेला इंडिया युथ गेम्ससाठी राज्य संघ निवड करण्याकरिता करण्यात येत असल्याने सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र दिले जाणार नाही. कोविड-१९ प्रतिबंधक नियमांचे पालक करणे सर्वांना बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी सचिन निकम यांच्याशी (८८५६०९३६०८) संपर्क साधावा तसेच जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी केले आहे.

# दडपण झुगारण्यासाठी ‘तो’ गाणे गायचा!

## वीरेंद्र सेहवागचे मैदानावरचे धम्माल किस्से

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा धडाडीचा फलंदाज वीरेंद्र सेहवाग सुरुवातीला सचिन तेंडुलकरची नक्कल करायचा, पण वर्षभरातच त्याने स्वत:तील सेहवागला शोधले आणि महान फलंदाज झाला. इंग्रजीची भीती ते दडपण झुगारण्यासाठी असलेली अनोखी पद्धत असे सेहवागचे अनेक किस्से स्टँड अप कॉमेडियन विक्रम साठ्ये यांनी एका मुलाखतीत सांगितले.

एका टूर्नामेंटदरम्यान सेहवाग म्हणाला, मला सामनावीर व्हायचे नाही. सामन्याआधीच तो म्हणाला, काही पण होऊ दे मला मॅन ऑफ दी मॅच नको मिळायला. कारण मग रवी शास्त्री इंग्रजीत प्रश्न विचारणार नी मला काही बोलता येणार नाही. नेमके त्यालाच मॅन ऑफ



दी मॅचचा पुरस्कार मिळाला आणि शास्त्रीने भल्या मोठ्या अलंकारिक भाषेत सामन्याचे वर्णन करून, त्याची स्तुती करून प्रश्न विचारला की, हे कसे काय जमले? सेहवागचे उत्तर होते ऐसी कोई बात नही है, बॉल बल्ले पे आ रहा था, बस मैने मार दिया!

बॅटिंग करताना सेहवाग गायचा. त्याचे कारण काय. कित्येक वेळा तो ओव्हर ओव्हर गायलाय. विक्रम साठ्येंनी त्याला विचारले की, तू का गातोस? त्यावर सेहवाग म्हणाला, जेव्हा प्रचंड दबाव असतो, तेव्हा मी नॉर्मल असताना कसा खेळलो असतो, तसा खेळ होण्यासाठी मी गातो. ज्या वेळी दबावामुळे मनात नकारात्मक विचार येतात, तेव्हा गाण्यामुळे तो नकारात्मक विचार निघून जातो आणि बॅटिंगवर त्या दबावाचा प्रतिकूल परिणाम होत नाही. त्यामुळे मागच्या बॉलचे दडपण पुढच्या बॉलवर जात नाही व नैसर्गिक खेळ खेळता येतो.

### सचिनने शोधून दिली होती ब्राव्होची बॅट

*महान खेळाडू सचिन तेंडुलकरबद्दलचा एक किस्साही या वेळी स्टँड अप कॉमेडियन विक्रम साठये यांनी कथन केला. वेस्ट इंडियाचा फलंदाज ड्वेन ब्राव्होची बॅट मुंबई इंडियन्सच्या ड्रेसिंग रूममध्ये हरवली होती. ती सापडत नव्हती. ब्राव्होला कळत नव्हते की सारख्या दिसणाऱ्या इतक्या बॅट्समधून आपली बॅट कुठली आहे? सचिन तेंडुलकरने सांगितले, तुझी बॅट मी चेक केली होती. तुझ्या वाटताहेत त्या चार पाच बॅट्स मला बघू दे. सचिनने त्या बॅट्सवर टिचकी मारून काय आवाज येतो ते चेक केले. नंतर त्याने एक बॅट ब्राव्होला दिली व सांगितले ही तुझी बॅट, कारण मी ती चेक केली होती नी हा तोच आवाज आहे.*

## विचित्र पद्धतीने फलंदाज बाद

**गाले : वृत्तसंस्था**

गाले येथे खेळल्या श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांच्यात पहिला कसोटी सामना खेळला जात आहे. या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी श्रीलंकेचा फलंदाज धनंजया डी सिल्वाने अर्धशतक झळकावले, पण त्यानंतर तो विचित्र पद्धतीने हिट विकेट झाला. चेंडू रोखण्याच्या प्रयत्नात डी सिल्वाने आपली बॅट यष्ट्यांवर मारली.

श्रीलंकेच्या डावातील ९५व्या षटकात ही घटना घडली. शॅनन गॅब्रिएलने चेंडू टाकला. यात ऑफ साइडवर खेळण्याच्या नादात चेंडूने धनंजयाच्या बॅटची कड घेतली. यानंतर तो चेंडू यष्ट्यांवर जात होता, तेव्हा तो रोखण्याच्या प्रयत्नात धनंजयाने आपली बॅट चुकून यष्ट्यांवर मारली. हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

# प्रो वर्ल्ड टॅलेंट अकादमीने जिंकला एजिस फेडरल इन्शुरन्स चषक

## यशस्वी क्रिकेटपटूंसाठी तंदुरुस्ती अत्यंत महत्त्वाची –वेंगसरकर

**मुंबई : प्रतिनिधी**


प्रो वर्ल्ड टॅलेंट क्रिकेट अकादमी संघाने एजिस फेडरल इन्शुरन्स चषक (१३ वर्षांखालील) स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले आहे. पारितोषिक वितरण समारंभात बोलताना भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी क्रिकेटपटूंना आता कसोटी, एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० अशा तीन विविध प्रकारांत खेळावे लागत असल्याने तंदुरुस्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, असे मत व्यक्त केले.




अंतिम सामन्यात प्रो वर्ल्ड टॅलेंट क्रिकेट अकादमी संघाने टायटन्स क्रिकेट अकादमीवर ७६ धावांनी विजय मिळवत स्पर्धेचे जेतेपद पटकावले. जय नाडर (५६) आणि आर्यन पवार (४०) यांच्या योगदानामुळे प्रो वर्ल्ड टॅलेंटने २० षटकांत ७ बाद १८७ अशी धावसंख्या उभारली. मग त्यांनी टायटन्सला ७ बाद १११ धावांवर रोखले.

वेंगसरकर पुढे म्हणाले की, क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत सातत्यपूर्ण कामगिरी करीत यशस्वी क्रिकेटपटू होण्यासाठी तुम्ही तंदुरुस्तीचा दर्जा अधिक वाढवण्याकडे लक्ष दिले पाहिजे. क्षेत्ररक्षण हा क्रिकेटमधील सर्वांत महत्त्वाचा घटक असून प्रत्येक संघाच्या प्रशिक्षकांनी यावर अधिक भर देण्याची गरज आहे.

# पुण्याचा ५० वर्षीय धावपटू ६० दिवसांच्या मॅरेथॉनसाठी सज्ज



**पुणे : प्रतिनिधी**

पुणेस्थित ५० वर्षीय आशिष कासोदेकर आता नव्या आव्हानासाठी सज्ज झाले आहेत. रविवारपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ते ६० दिवसांत ६० पूर्ण मॅरेथॉन धावणार आहेत. प्रजासत्ताक दिनासाठी अंतिम मॅरेथॉनची वेळ निश्चित करण्यात आली आहे.

२८ नोव्हेंबर ते २६ जानेवारी या कालावधीत ६० दिवसांत ६० पूर्ण मॅरेथॉन अंतर धावण्यासाठी सर्वाधिक सलग दिवस गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अल्ट्रा डायनॅमो ही जगातील सर्वात लांब बहु-अंतराची पायी शर्यत आहे. अल्ट्रा डायनॅमोचे संस्थापक आणि रेस डायरेक्टर अरविंद बिजवे यांनी सांगितले की, धावण्याचा मार्ग पुणे विद्यापीठात आहे (५-किमी लूप) आणि धावपटू ज्यांना भाव घ्यायचा आहे त्यांना ६०दिवसाचे टायमिंग सर्टिफिकेट, फिनिशर मेडल, टायमिंग चिप आणि ऑन-रूट सपोर्ट मिळेल.

६० दिवसांच्या शर्यतीसाठी, धावपटू कोणतीही तारीख निवडू शकतो. जर ते आठ दिवस किंवा त्याहून अधिक दिवस चालले तर त्यांना अल्ट्रा डायनॅमो शीर्षक स्मृतिचिन्ह मिळू शकते.


## इंडोनेशिया खुली बॅडमिंटन स्पर्धा

# लक्ष्य, कश्यप पहिल्याच फेरीत गारद

**बाली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा खेळाडू लक्ष्य सेन आणि अनुभवी पारुपल्ली कश्यप इंडोनेशिया बॅडिमटन खुल्या स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत गारद झाले आहेत.

पुरुष एकेरीत २१ वर्षीय लक्ष्यला अव्वल मानांकित जपानच्या केंटो मोमोटाकडून २१-२३, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. लक्ष्यने दोन वेळच्या जगज्ज्ञेत्या मोमोटाला उत्तम लढा दिला, मात्र दोघांमध्ये २१-२१ अशी बरोबरी असताना मोमोटाने खेळ उंचावत पुढील दोन्ही गुण जिंकले. दुसऱ्या गेममध्येही लक्ष्यने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा फायदा झाला नाही.





दुसरीकडे सिंगापूरच्या लो किन येवने कश्यपला २१-११, २१-१४ अशी धूळ चारली. पुरुष दुहेरीत, एमआर अर्जुन आणि ध्रुव कपिला यांचेही आव्हान संपुष्टात आले. त्यांच्यावर कोरियाच्या चोइ सोलग्यू आणि किम वोन्होने २०-२२, १३-२१ अशी मात केली. तसेच मिश्र दुहेरीच्या पहिल्या फेरीत वेंकट गौरव प्रसाद आणि जुही देवांगणचा योनस राल्फी जेन्सन आणि लिंडा एल्फेर या जर्मन जोडीने १२-२१, ४-२१ असा पराभव केला.

# भारताची जुनी जर्सी पुन्हा आणायची वेळ आलीय; जाफरचे गमतीशीर ट्वीट

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी सलामीवीर क्रिकेटपटू वसीम जाफरने भारताची ९०च्या दशकातील पिवळी जर्सी परत आणण्याची मागणी केली आहे. टीम इंडियाने भारतात आणि भारताबाहेर झालेल्या द्विपक्षीय मालिकांमध्ये अप्रतिम कामगिरी केली आहे, परंतु गेल्या काही वर्षांमध्ये या संघाला आयसीसीच्या स्पर्धांमध्ये जेतेपद मिळवण्यात अपयश येत आहे. या वर्षी भारतीय संघाने विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना गमावल्यानंतर टी-२० वर्ल्डकपमध्येही निराशा केली.



भारताला यश मिळावे यासाठी जाफरने एक आगळावेगळा सल्ला दिला आहे. याचे कारण म्हणजे यंदा म्हणजेच २०२१मध्ये पिवळ्या रंगाची जर्सी असलेल्या संघांचा बोलबाला राहिला आहे. आयपीएल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कोलकाता नाइट रायडर्स आणि चेन्नई सुपर किंग्ज हे दोन्ही संघ आमनेसामने होते. चेन्नई सुपर किंग्ज संघाने बाजी मारली. यानंतर ऑस्ट्रेलियाने न्यूझीलंडचा पराभव करून पहिल्यांदाच टी-२० वर्ल्डकपचे विजेतेपद पटकावले. आता तामिळनाडूने कर्नाटकचा पराभव करून तिसऱ्यांदा सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धा जिंकली. चेन्नई सुपर किंग्ज, ऑस्ट्रेलिया आणि तामिळनाडू यांच्या जर्सी पिवळ्या रंगांच्या आहेत. त्यामुळे जाफरने भारताची जुनी पवळी जर्सी परत आणण्याची मागणी केली आहे.

जाफरने सोशल मीडियावर शेअर केलेला सचिन तेंडुलकरचा फोटो १९९४च्या विल्स ट्रॉफीमधील आहे. या स्पर्धेत भारताशिवाय तत्कालीन विश्वविजेता पाकिस्तान, यजमान श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाचा संघही सहभागी झाला होता. या स्पर्धेत सचिनने आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले होते. हे शतक त्याने ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध ठोकले होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com